# ।। राजयोग ।।


## भक्तियुक्त कर्मयोग

**२१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद् भगवद्गीतेचे व्यावहारिक ज्ञान**

(वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजनीतिक जीवनाचा यशोमार्ग)

**(सचित्र मराठी आवृत्ती - संपूर्ण)**

पुस्तकाची मांडणी व २ भाग




**श्रीमद्भगवद्गीतेतील अंतर्निहित शिकवणींचे वास्तविक ज्ञान**

**(भक्तियुक्त कर्मयोग : सनातन धर्माची मूळ शिकवण)**

**द्वारा : श्रीकांत रामचंद्र देशमुख**

BYK YOG

# BYK योग आध्यात्मिक फोरम

Registration Number

L-156331/2024

**प्रकाशक :** BYK **योग आध्यात्मिक फोरम**

पत्ता : फ्लॅट नं.३, गृहकुल अपार्टमेंट, प्लॉट नं. ५, बन्सीलालनगर,
श्री स्वामी समर्थ केंद्राजवळ, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५ (महाराष्ट्र)

CIN : U85300MH2022NPL389295 Mobile : 9823240823

Email : contact@bykyog.com / info@bykyog.com, Website : www.bykyog.com

---

सातवी आवृत्ती : बुधवार, १ जानेवारी २०२५, २००० प्रती

---

**संपर्क प्रमुख :** श्री. विलास मधुकरराव जोशी गुरुजी
(भगवान श्री हनुमान भक्त), वेदशास्त्र आचार्य
पंडित, विवेचक व मार्गदर्शक : श्रीमद्भगवदगीता, श्रीमद्भागवतम्, श्रीरामचरितमानस, शिवपुराण, देवीभागवतम्. ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र, मंत्रशास्त्र, रत्नशास्त्र यांचे जाणकार व मार्गदर्शक.
पत्ता : श्री हनुमान मंदिर, छावणी परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००२ (महाराष्ट्र)
मो. ९४२३४५५४४९

श्री. श्रीकांत रामचंद्र देशमुख
मो. ९८२२०२९२८३
श्री. भागवत कडू पाटील
मो. ९८५०५००८५८
श्री. शैलेश बाबुराव काळंब
मो. ७३८५६७४६६४
श्री. परशुराम विठ्ठलराव कुंदे
मो. ७८७५४०१३०५

प्रमुख सल्लागार :
डॉ. शरद गंगाधर भोगले
सौ. स्मिता शरद भोगले

वितरण प्रमुख
सौ. वंदना रत्नाकर देशमुख
श्री. रत्नाकर बबनराव देशमुख
सौ. अनुश्री पियुष कोटेचा (देशमुख)
श्री. पियुष प्रकाश कोटेचा

कव्हर आणि सर्व रंगीत पृष्ठांची संकल्पना आणि संगणक ग्राफिक्स
श्री. अशोक अरविंदराव देशपांडे
श्री. श्रीनिवास केशवराव पहिनकर
श्री. ललित रोहिदास गांगवे

वितरण मूल्य : ₹ ३० फक्त

© BYK **योग आध्यात्मिक फोरम सर्वाधिकार सुरक्षित**

सूचना : या पुस्तकाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग पुनरुत्पादित किंवा कॉपी केला जाऊ नये. तसेच पुनर्प्राप्ती प्रणालीमध्ये संग्रहित किंवा कोणत्याही प्रकारे प्रसारित केला जाऊ नये. याचे उल्लंघन केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ।। राजयोग ।।

## भक्तियुक्त कर्मयोग

**२१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद्भगवद्गीतेचे व्यावहारिक ज्ञान**

(वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजनीतिक जीवनाचा यशोमार्ग)

**(सचित्र मराठी आवृत्ती–संपूर्ण)**

पुस्तकाची मांडणी व २ भाग

द्वारा

श्रीकांत रामचंद्र देशमुख

BYK YOG

Bhaktiyuktã Karmã Yog

(भक्तियुक्त कर्मयोग आध्यात्मिक फोरमचा उपक्रम)

## अनुक्रमणिका

**भाग २ : संक्षिप्त विवेचन** ८३ ते १३५

राजयोग म्हणजे भक्तियुक्त कर्मयोग थोडक्यात कसा समजून घ्यावा, कसा समजावून सांगावा व राजयोग या पुस्तकातील माहितीबद्दलचे प्राथमिक परीक्षण कसे करावे याचे मार्गदर्शन

**लेखकाचा परिचय** १३६ ते १३७

BYK **आध्यात्मिक फोरमबद्दल माहिती** १३८ ते १३९

-------o○o-------

# भाग २ : संक्षिप्त विवेचन

राजयोग म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग थोडक्यात कसा समजून घ्यावा, कसा समजावून सांगवा व राजयोग या पुस्तकातील माहितीबद्दलचे प्राथमिक परीक्षण कसे करावे याचे मार्गदर्शन



दिव्य विनम्रतेतून आत्मनिवेदन भक्ती

**शरीररूपी आत्मा व शरीररूपी परमात्मा यांचा नैसर्गिक संबंध**

प्रत्येक व्यक्तीचा तिच्या स्वतःच्या आवडत्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेशी असलेला नैसर्गिक संबंध.



मानवी शरीर म्हणजे दोन विपरीत स्वभावाच्या गुणांच्या सहअस्तित्वाने निर्माण झालेल्या अहंकाररूपी शक्तीचे स्थूल स्वरूप आहे.

(संदर्भ पृष्ठ १९२ ते १९७ पाहावे)

## भाग २
## संक्षिप्त विवेचन


| अनुक्रमांक | विषय - सूची | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| ❖ | २१ व्या शतकाच्या वैज्ञानिक युगात श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे व्यावहारिक ज्ञान. राजयोग म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग थोडक्यात कसा समजून घ्यावा, कसा समजावून सांगावा व राजयोग या मुख्य पुस्तकातील माहितीबद्दलचे प्राथमिक परीक्षण कसे करावे याचे मार्गदर्शन (विवेचन वेळ : ४५ ते ९० मिनिटे) | |
| १ ते ९ | राजयोग साधनेची माहिती व साधनेचा अर्थ काय? | ८७-८९ |
| १० ते १४ | योग, कर्मयोग, भक्तियोग, भक्तियुक्त कर्मयोग साधनेची उदाहरणांसहित माहिती | ९०-९३ |
| १५ ते १८ | मानवाच्या जिवंत अस्तित्वातील तीन मुख्य घटक, मी म्हणजे अहंकार (शरीर) व मी म्हणजे योगी (आत्मा) या दोन भूमिकेची उदाहरणासहित व्याख्या | ९३-९६ |
| १९ | आमच्या जिवंत अस्तित्वाचे या जगातील प्रयोजन काय आहे? तसेच रोजच्या जीवनात कर्म करण्यासाठी मिळालेली दोन महत्त्वपूर्ण साधने व मिळालेल्या दोन प्रकारच्या शक्तींचे ज्ञान | ९६-१०० |

| अनुक्रमांक | विषय - सूची | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| २० | राजयोग साधनेचे मुख्य सूत्र (सनातन धर्माची मूळ शिकवण) | १००-१०१ |
| २१ ते २३ | राजयोग म्हणजे भक्तियुक्त कर्मयोग साधनेस असलेली दोन वरदाने | १०१-१०२ |
| २४ ते २६ | राजयोग साधनेची दोन रोल मॉडेल्स (श्री छत्रपती शिवाजी महाराज व मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेब) | १०२-१०४ |
| २७ | या साधनेबद्दलची घोषणा व हमी | १०४-१०५ |
| २८ | भक्ती आणि कर्म यांची सांगड घालण्यासाठी ईश्वराने केलेल्या तीन तरतुदी (प्रोव्हिजन्स) | १०५-१०६ |
| २९ | राजयोग सूत्रातील रहस्य व ईश्वराची आमच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात आमच्याकडून असलेली अपेक्षा | १०६ |
| ३० | ईश्वराची आमच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात आमच्याकडून काय अपेक्षा असते? | १०६-१०७ |
| ३१ | सांसारिक जीवनातील सहा प्रकारची कर्तव्य कर्मे उदाहरणांसहित | १०७-१०८ |
| ३२ व ३३ | सांसारिक जीवनात कर्म करण्यासाठी ईश्वराने दिलेल्या दोन शक्तीची माहिती व इष्ट देवतेचे स्वरूप याबद्दलचे ज्ञान | १०८-१११ |
| ३४ | सर्व इष्ट देवतांचे विश्वरूप परमात्म्याच्या स्वरूपात एकीकरण | ११२ |
| ३५ | प्रत्येक व्यक्तीतील स्वतःच्या अहंकाराची शक्ती आणि पुरुषार्थ; वाक्प्रचार/उक्ती : मिथ्या अहंकार काय दर्शविते?; अहंकाराच्या शक्तीचे वैज्ञानिक स्पष्टीकरण व अहंकाराच्या शक्तीची मर्यादा. | ११२-११६ |

| अनुक्रमांक | विषय – सूची | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| ३६ | आजच्या वैज्ञानिक युगात राजयोग सूत्र वापरण्यात होणारी गफलत व राजयोग साधकांसाठी त्यांच्या इष्ट देवतेची चार मुख्य स्वरूपात उपासना | ११६–१२० |
| ३७ ते ३९ | भक्तियुक्त कर्मयोग साधनेचा सनातन धर्माशी संबंध व आपल्या वरील पूर्व संस्कार | १२०–१२२ |
| ४० ते ५० | राजयोग साधनेच्या संदर्भातील महत्त्वाच्या अशा काही गूढ गोष्टी | १२२–१२७ |
| ५१ ते ५२ | मोबाईल सेटच्या उदाहरणांवरून राजयोग साधनेची समज | १२८ |
| ५३ ते ५४ | राजयोग साधना आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स, स्मार्ट फोन यांच्यातील साधर्म्य व फरक | १२८–१३१ |
| ५५ ते ५८ | राजयोग साधनेतील काही अधिक माहिती | १३१–१३२ |
| ५९ ते ६० | सांसारिक जीवनाच्या संबंधात श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील काही श्लोकांचे अचूक ज्ञान | १३३–१३५ |


-------oOo-------

**२१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे व्यावहारिक ज्ञान**

राजयोग म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग थोडक्यात कसा समजून घ्यावा, कसा समजावून सांगावा व राजयोग या मुख्य पुस्तकातील (भाग ३) माहितीबद्दलचे प्राथमिक परीक्षण कसे करावे याचे मार्गदर्शन.

---

विवेचन वेळ ४५ मिनिटे ते ९० मिनिटांपर्यंत

**१)** या २१ व्या शतकातील वैज्ञानिक काळात श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे व्यावहारिक ज्ञान म्हणजेच राजयोग साधना. अनादि काळापासून या राजयोग साधनेद्वारे अनेक लोकांनी वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राजसी जीवनात यश, समृद्धी मिळवली आहे. त्यामुळेच सांसारिक जीवनात सुख, यश, समृद्धी मिळविण्यासाठी राजयोग साधनेचा उपयोग केला जातो. काळानुरूप राजयोग साधनेचे स्वरूप बदलत जाते.

**२)** भगवद्‌गीतेतील आध्यात्मिक भाषेत गीतेच्या या व्यावहारिक ज्ञानाला 'भक्तियुक्त कर्मयोग' असे म्हणतात. भगवान श्रीकृष्णांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेत सर्वसामान्य लोकांसाठी उपयुक्त अशा या भक्तियुक्त कर्मयोग साधनेला परमगोपनीय ज्ञान म्हणून संबोधिले आहे. कारण या योगसाधनेत सांसारिक जीवनातील वैयक्तिक, पारिवारिक, व्यावसायिक, सामाजिक व राजनीतिक जीवनातील कोणत्याच गोष्टींचा त्याग करावा लागत नाही.

**३)** श्रीमद्‌भगवद्‌गीतेची रचना करताना महर्षी व्यासदेवांना याची पूर्ण जाणीव झालेली होती की, सर्वसामान्य सांसारिक लोकांना गीतेतील या व्यावहारिक ज्ञानाचा उपयोग करून राजयोगी जीवन जगणे शक्य आहे. म्हणून महर्षी वेदव्यासांनी या भक्तियुक्त कर्मयोग साधनेला राजयोग असे नाव दिलेले आहे.

४) भक्तियोग आणि कर्मयोग यांच्या एकत्रित सरावावर आधारित असलेले गीतेचे हे ज्ञान विद्यार्थी दशेत पारिवारिक आयुष्यात व्यावसायिक, सामाजिक व राजनीतिक जीवनात सुद्धा सहजपणे सुख, यश, समृद्धी व स्थैर्य मिळवून देण्यास अतिशय प्रभावी असे साधन आहे.

५) राजयोग म्हणजे भक्तियुक्त कर्मयोग साधनेची महत्ता स्पष्ट करताना स्वतः भगवान श्रीकृष्णांनी सांगितले आहे की, जी व्यक्ती भक्तियोग आणि कर्मयोग याचा एकत्रित सराव करील त्या व्यक्तीला हे सांसारिक आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे लौकिक असे पुस्तकी ज्ञान व व्यावहारिक ज्ञान त्याच्या आवश्यकतेनुसार सहजपणे प्राप्त होत राहील. त्यासाठी त्याला फार ओढाताण करावी लागणार नाही.

६) भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाशी चर्चा केलेल्या सर्व योगसाधनांपैकी भक्तियुक्त कर्मयोग साधना ही एकमेव योगसाधना अशी आहे की, जी दैनंदिन आयुष्यात आचरण्यास अतिशय सोपी आहे. त्याला वयाचे बंधन नाही. लहान मुले, तरुण, गृहस्थ जीवन जगणारे, ज्येष्ठ नागरिक, स्त्री-पुरुष अशा सर्वांनाच ती यशदायी आहे. आणि वैयक्तिक, पारिवारिक, व्यावसायिक जीवनात हमखास म्हणजे १०० टक्के यश, सुख, समृद्धी, समाधान, स्थैर्य देते.

७) **सांसारिक जीवनाच्या आवश्यकता काय आहेत? सांसारिक आयुष्यात आपल्याला काय हवे असते?** सर्वांची सतत सुखप्राप्तीसाठी तळमळ असते व त्यासाठी प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करत असते, म्हणूनच आपल्या वैयक्तिक, पारिवारिक, व्यावसायिक आयुष्यात प्रत्येकाला यश, संपत्ती, पैसा हवा असतो. त्यामुळेच आमच्यात कर्म करण्याची प्रवृत्ती आहे. सांसारिक यश म्हणजे चांगले शिक्षण / डिग्री मिळवणे, मोठ्या पगाराची नोकरी मिळणे, नंतर चांगली मुलगी / मुलगा पाहून लग्न होणे, चांगले व्यावसायिक व पारिवारिक आयुष्य जगता येणे वगैरे वगैरे. ह्या सर्वांमागील मूळ कल्पना सुखाची प्राप्ती करणे हीच असते.

८) आता असे बघा, सांसारिक जीवन म्हटले की, वैयक्तिक, कौटुंबिक, व्यावसायिक जीवनात अडचणी, ताणतणाव, साम्पत्तिक अडचणी, शारीरिक व्याधी वगैरे गोष्टी नैसर्गिक आहेत. कारण या सर्व गोष्टी सांसारिक जीवनाचा

अविभाज्य घटक आहेत; परंतु ज्याप्रमाणे पोहता येणाऱ्या व्यक्तीला पाण्यात पडल्यावर पाण्याचा त्रास होत नाही, त्याचप्रमाणे भक्तियुक्त कर्मयोग साधकांना पण सांसारिक आयुष्यातील चढ -उतारांचा सामना करताना त्रास होत नाही. याचे सरळ कारण असे आहे की, सांसारिक जीवनाच्या दैनंदिन जीवनातील सर्व प्रकारची आमची कर्मे आम्ही करत असलेल्या क्रिया व जीवनात येणारे सुख-दुःख, यश-अपयश, सिक्युरिटी - इनसिक्युरिटी वगैरे वगैरे अशा सर्व विपरीत स्वभावाच्या जोड्या हेच या योग साधनेचे मुख्य साधन आहे. त्यामुळे या योगसाधनेत आम्हाला आमच्या दैनंदिन जीवनात कोणताही विशेष असा बदल करण्याची आवश्यकता नसते.

ज्या व्यक्ती भक्तियुक्त कर्मयोग साधना दैनंदिन जीवनात अंगीकारतात त्यांना सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करता येते व त्यांच्या प्रगतीत, त्यांचा साम्पत्तिक उत्कर्ष होण्यात, सर्वांगीण विकास होण्यात फरक पडत नाही. उलटपक्षी त्यांना जीवनात येणाऱ्या अडचणींचा वैयक्तिक, पारिवारिक किंवा व्यावसायिक जीवनात स्वतःचा सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी उपयोगच होतो.

**९) साधनेचा अर्थ काय?** हा शब्द आध्यात्मिक आचरण, वर्तणूक, वागणूक, विधि आदी बाबींकडे निर्देश करतो. आध्यात्मिक वाढीच्या उद्देशाने स्वयंस्फूर्तीने स्वयंशिस्तीत राहून आणि जागरूकतेतून साधना केली जाते. असे आचरण म्हणजे आपल्यातील अहंकाराच्या शक्तीवर आपल्या आत्मबलाने (आत्म्याच्या शक्तीने) नियंत्रण मिळविण्यासाठी स्वयंशिस्तीचा सराव होय. असे आचरण साधकाला आपल्या इष्ट (आराध्य) देवतेशी अशा भावनेने संबंध बनविण्यास प्रोत्साहित करते की, साधकाचे इष्ट (आराध्य) दैवत, हे परमपिता परमेश्वर, ईश्वर किंवा परमात्म्याचेच रूप आहे. आपल्या इष्ट देवी/देवता (आराध्य, परमात्मा, ईश्वर, परमेश्वर) यांचे प्रती वाटणारे प्रेम, आदर व श्रद्धेपोटी कोणतीही साधना स्वीकारली जाते. असे प्रेम, आदर व श्रद्धेचेच पुढे विश्वासात रूपांतर होते आणि साधनेत साधकाची प्रगती होत राहते. आध्यात्मिक साधनेत साधकाचे आपल्या इष्ट देवी/देवता (आराध्य, परमात्मा, ईश्वर, परमेश्वर) यांच्याशी भावनिक संबंध स्थापित होतात. हाच आध्यात्मिक साधनेचा उद्देश आहे व आध्यात्मिक साधनेचे ध्येय पण हेच आहे.

**१०) योग म्हणजे काय?** प्रयत्नपूर्वक ईश्वराशी म्हणजेच आपल्या इष्ट देवतेशी संपर्क स्थापित करणे याला योग असे म्हणतात.

**प्रश्न असा येतो की ,** आपल्याला ईश्वराशी म्हणजेच आपल्या इष्ट देवतेशी योग साधण्याची आवश्यकता का आहे? काही उदाहरणांवरून आपल्याला परमात्म्याशी म्हणजेच आपल्या इष्ट देवतेशी योग साधण्याची आवश्यकता व त्याचे महत्त्व समजून घेता येते.

**पहिले उदाहरण :** बाजूच्या चित्रामध्ये दाखविलेल्या आकाशात उडणाऱ्या विमानाचा विचार केल्यास लक्षात येते की, विमान चालवताना वैमानिकाला सतत कंट्रोल रूमशी संबंध ठेवावा लागतो. दिमाखात उडणाऱ्या विमानाला, मार्गदर्शन व खरी सुरक्षा त्या विमानाच्या सतत कंट्रोल रूमशी असलेल्या संबंधांमुळेच असते. वैमानिकाने कंट्रोल रूमशी संपर्क न ठेवल्यास, म्हणजे वैमानिकाने कंट्रोल रूमशी योग न केल्यास विमानाचे भरकटणे निश्चित असते.




(संदर्भ पृष्ठ ४३ पाहावे)

**दुसरे उदाहरण :** बाजूच्या चित्रामध्ये दाखविलेल्या आपल्या शरीरातील अवयवांचे सुद्धा असेच आहे. जोपर्यंत शरीराचे अवयव शरीराशी जुडलेले म्हणजे शरीराशी योग करत आहेत तोपर्यंत त्यांना महत्त्व असते. शरीरापासून त्यांचा संपर्क तुटल्यास, ते वेगळे झाल्यास त्यांचे महत्त्व व उपयोग संपतो.




(संदर्भ पृष्ठ ४३ पाहावे)

**तिसरे उदाहरण :** बाजूच्या चित्रामध्ये दाखविलेल्या आई व तिच्या बाळाच्या संबंधाचे, विचार केल्यास पण लक्षात येते की, जोपर्यंत बाळ आईच्या देखरेखीखाली नियंत्रणात व आईशी संपर्कात असते, तोपर्यंत त्याला सर्व सुखे आपोआप प्राप्त होतात. परंतु, आईपासून बाळ वेगळे झाल्यास ते कावरेबावरे होते. त्या बाळात असुरक्षिततेची भावना प्रबळ होते. त्यामुळे बाळास सतत आपल्या आईशी योग करणे आवश्यक असते.



(संदर्भ पृष्ठ ४३ पाहावे)

आमच्यातील आत्मा ईश्वरापासून म्हणजे परमात्म्यापासून उत्पन्न झाला आहे व त्याचा एक छोटासा अंश आहे. लहान मूल व त्याची आई असे हे नाते आहे. त्यामुळे शरीराच्या रूपात, सांसारिक जीवनात, सुख, यश, प्राप्त करण्यासाठी आत्मा सदैव परमात्म्यावर अवलंबून असतो. त्यामुळे आत्म्यास सतत परमात्म्याशी संपर्कात राहावे लागते. म्हणजेच परमात्म्याशी योग साधावा लागतो. अशा कारणांमुळे जीवनात योगसाधना आवश्यक आहे व यामुळेच सर्व प्रकारच्या योगसाधनांना महत्त्व प्राप्त झाले.

- त्यामुळे वरील उदाहरणांवरून लक्षात येते की, आपल्या आत्म्याचे सुद्धा परमात्म्याशी म्हणजे या विश्वाच्या नियंत्रकाशी आपली भावनिक ओळख आणि संबंध असल्यास आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात मार्गदर्शन मिळत राहते व त्यामुळे आपल्या सांसारिक जीवनात आपली प्रगती सुनिश्चित होते.

**आता आपण योग म्हणजे काय व योगी म्हणजे काय हे पाहू?** प्रयत्नपूर्वक ईश्वराशी म्हणजेच आपल्या इष्ट देवतेशी संपर्क स्थापित करणे याला योग असे म्हणतात. आणि जी व्यक्ती सतत आपल्या इष्ट देवतेच्या संपर्कात राहते तिला योगी असे म्हणतात.

११) गीतेतील सर्व योग पद्धती सांगितल्यानंतर श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वतःच्या सुखासाठी निर्णय करण्याची मुभा दिली तेव्हा सर्व योगसाधनांमध्ये अर्जुनाने ‘भक्तियुक्त कर्मयोग’ हीच योगसाधना आंगिकारली व त्याला युद्धात विजय मिळाला.

**१२) कर्मयोग म्हणजे काय?** आपण दैनंदिन आयुष्यात करत असलेल्या आपल्या विविध कर्मांद्वारे ईश्वराशी म्हणजेच आपल्या इष्ट देवतेशी संबंध प्रस्थापित करणे याला कर्मयोग म्हणतात.

**उदाहरणार्थ** बाजूच्या चित्रात दाखविल्याप्रमाणे आपल्या शरीरातील सर्व अवयव आपल्या कर्मांद्वारे सतत आपल्या शरीराशी संपर्कात राहतात. आपल्या इष्ट देवतेशी आपल्या कर्तव्यकर्मांद्वारे असा संपर्क कर्मयोग दर्शवितो.




(संदर्भ पृष्ठ ४३ पाहावे)

**१३) भक्तियोग म्हणजे काय**? आपल्या जीवनात सतत ईश्वर चिंतनात राहणे व केवळ ईश्वरासंबंधातील कर्मे करणे याला भक्तियोग साधना म्हणतात.

**उदहरणार्थ** : बाजूच्या चित्रात दाखविल्याप्रमाणे आई व तिच्या बाळाच्या संबंधाचा विचार केल्यास बाळ पूर्णपणे त्याच्या आईवर अवलंबून राहते व त्यामुळे सतत केवळ आपल्या आईशी संपर्क ठेवून असते. आपल्या इष्ट देवतेशी असा सततचा संपर्क भक्तियोग दर्शवितो.

**१४) भक्तियुक्त कर्मयोग म्हणजे काय**? आपल्या दैनंदिन जीवनात आपण करत असलेली कर्तव्य कर्मे (कर्तव्य परायण कृत्ये) आपल्या इष्टदेवतेची सेवा म्हणून केली पाहिजेत. ही भावना आपल्या व्यक्तिमत्त्वात विकसित करणे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वात तशी प्रवृत्ती जागृत करणे याला भक्तियुक्त कर्मयोग असे म्हणतात.

**उदाहरणार्थ** : बाजूच्या चित्रामध्ये दाखविल्याप्रमाणे आकाशात दिमाखात उडणारे विमान आपले उडण्याचे कर्तव्यकर्म करत असताना सतत कंट्रोल रूमशी संपर्क ठेवत असते. कर्तव्यकर्म करत असताना




(संदर्भ पृष्ठ ४३ पाहावे)

आपल्या इष्ट देवतेशी असा संपर्क भक्तियुक्त कर्मयोग दर्शवितो.

आम्ही सर्व जाणतो की, शरीराच्या एखाद्या अवयवाचा शरीराशी संबंध तुटल्यास त्याची देखभाल व सुरक्षा होत नाही; व त्या अवयवाला काही महत्त्वपण राहत नाही. किंवा लहान बाळाचे आपल्या आईशी असलेल्या शारीरिक व भावनिक संबंधांमुळेच त्याची सुरक्षा देखभाल यश संगोपन होत असते. आकाशातील दिमाखात उडणाऱ्या विमानाच्या बाबतीत पण हे सत्य आहे. त्याचप्रमाणे कर्म करत असताना आमचे आमच्या इष्ट देवतेशी शारीरिक व भावनिक संबंध असल्यास या जगात आमची सुरक्षा, आमचे सुख, यश, समृद्धी, सर्वांगीण विकास यात अडचणी येत नाहीत व सांसारिक जीवनात आमची प्रगती सुनिश्चित होते.

**१५)** याप्रमाणे भगवद्गीतेतील भक्तियुक्त कर्मयोग साधनेची ओळख, व्याप्ती व महत्ता जाणून घेतल्यानंतर आता आपण भक्तियुक्त कर्मयोग साधना समजून घेण्याच्या दृष्टीने काही मूलभूत गोष्टींची उजळणी करू. आमचे जिवंत अस्तित्व तीन गोष्टींवर अवलंबून असते. **१) आत्मा ,२) शरीर, ३) परमात्मा.**

**१६) आमच्या जिवंत अस्तित्वाचा पहिला महत्त्वाचा घटक म्हणजे आमच्या शरीरात जन्मापासून मृत्यूपर्यंत असणारा आमचा आत्मा.**



(संदर्भ पृष्ठ ४४ पाहावे)

या आत्म्याची अनुभूती आम्ही श्वासोच्छ्वासाच्या अनुभवातून घेत असतो. आमच्यातील आत्मा ईश्वरापासून म्हणजे परमात्म्यापासून उत्पन्न झाला आहे व त्याचा एक छोटासा अंश आहे. लहान मूल व त्याची आई तसेच शरीराच्या अवयवांचा शरीराशी संबंध असे हे नाते आहे. या नात्यात प्रेम आहे व जबाबदारीसुद्धा आहे, त्यामुळे सांसारिक जीवनात जसे लहान मूल आपल्या आईवर अवलंबून असते व जसे शरीराचे अवयव सतत शरीराच्या सेवेत असतात. त्याचप्रमाणे शरीराच्या रूपात आत्मा सदैव परमात्म्यावर अवलंबून असतो व परमात्म्याच्या सेवेत राहण्याच्या प्रयत्नात असतो. त्यामुळे शरीराच्या

रूपात वैयक्तिक पारिवारिक व व्यावसायिक जीवनात आत्म्याला दोन भूमिकांमध्ये कर्म करण्याची आवश्यकता असते.

**परमात्म्याची सेवा करण्याच्या दृष्टीने शरीरात आत्म्याची पहिली भूमिका** मी म्हणजे योगी अशी असते. या भावनेत आत्मा स्वतःला योगी समजतो व सदैव आपल्या इष्ट देवतेची सेवा करण्याच्या भावनेने कर्म करतो. त्यामुळे या भूमिकेत आत्मा अहंकाराच्या पांघरूणातून एक योगी बनून बाह्य जगात काही ना काही देण्याच्या भावनेत सेवाभावनेतूनच कर्म करत असतो. या भावनेला आपण परमार्थ असे संबोधितो. योगी या रोलमधे बाह्य जगाकडून आत्म्याला काहीही अपेक्षा नसते.

**१७) आमच्या जिवंत अस्तित्वाचा दुसरा महत्त्वाचा घटक** म्हणजे आमचे शरीर व आमच्यातील 'मी' ची भावना म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाची भावना. **ही 'मी' ची जाणीव प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या अहंकाराच्या स्वरूपात समजते.** या अहंकाराच्या भावनेतूनच आत्मा आमच्या शरीराला व शरीरातील सर्व अवयवांना, मनाला, बुद्धीला प्रोटेक्ट करत असतो व त्यांची देखभाल करत असतो. तसेच अहंकाराच्या भावनेतूनच आत्मा शरीराद्वारे आमचे मन, आमची बुद्धी, आमची स्मृती, चित्त व आमच्या इंद्रियांचा उपयोग करून विविध कर्मे करत असतो. शरीराच्या रूपात कर्म करून ईश्वराची सेवा करण्यासाठी आत्म्याला अहंकाराचीसुद्धा आवश्यकता असते. व त्यासाठी आत्म्याला आपले शरीर, मन, बुद्धी यांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी असते. त्यामुळे शरीरात आत्म्याची अहंकार म्हणून दुसरी भूमिका – ही **मी म्हणजे योगी** या आत्म्याच्या पहिल्या भूमिकेच्या पूर्णपणे विपरीत असते.

शरीराचे अस्तित्व टिकवण्यासाठी आपल्या शरीरात अहंकाराच्या भूमिकेत आत्मा **मी म्हणजे शरीर, मी म्हणजे अहंकार, मी म्हणजे सर्वेसर्वा** अशा भावनेत कर्म करतो व आत्म्याचे आत्मबल हे अहंकाराचे काम करण्याचे मुख्य साधन म्हणून वापरतो. त्यामुळे आमचा अहंकार अतिशय बलिष्ठ व संवेदनशील भासतो.

या दुसऱ्या भूमिकेत शरीरात अहंकाराच्या पांघरूणातून आत्मा केवळ शरीर, मन, बुद्धी यांचा विचार करतो व त्यामुळे केवळ सांसारिक सुखे मिळविण्याच्या

प्रयत्नात कर्म करतो. त्यामुळे अशा भावनेत अहंकार सतत स्वतःला काहीतरी हवे असते म्हणून किंवा काहीतरी नको असते म्हणून अशा दोन विपरीत भावनेतून कर्म करीत असतो. त्यामुळे आमच्या मनात, बुद्धीत व स्मृतीत नेहमी दोन विपरीत विचार व विपरीत भावना कार्यरत असतात. या भावनेचा अतिरेक झाल्यास त्याला आपण स्वार्थीपणा असे म्हणतो.

सांसारिक जीवनातील प्रत्येक व्यक्ती, **'मी म्हणजे अहंकार आणि मी म्हणजे योगी'** अशा दोन्ही भूमिकेतून जीवन जगत असते. योगी म्हणून आपण या जगात काही ना काही देत असतो व अहंकाराच्या भावनेत आपण या जगातून काही ना काही घेत असतो. **सांसारिक जीवनात प्रत्येक व्यक्तीतील या दोन्ही भावना व्यक्तीच्या शरीराचे अस्तित्व टिकविण्यासाठी जीवनात संतुलन राहण्यासाठी व दैनंदिन कर्मे करण्यासाठी आवश्यक आहेत.**



(संदर्भ पृष्ठ ४५ पाहावे)

**उदाहरणार्थ** : बाजूच्या चित्रामध्ये गाय व तिचे दूध पिणारे वासरू यांच्या उदाहरणातून शरीरातील आत्म्याच्या, दोन मुख्य भूमिका मी म्हणजे आत्मा - योगी आणि मी म्हणजे शरीर -अहंकार आपण समजून घेऊ.

या चित्रात दाखविलेली वासरास दूध पाजणारी गाय म्हणजे आत्म्याचा शरीरातील पहिला रोल- मी म्हणजे आत्मा मी म्हणजे योगी. या रोलमध्ये गाईचा आत्मा तिच्या शरीराच्या रूपात आपल्या वासराला केवळ देण्याच्या भावनेत दूध देण्याचे कर्म करत असतो. वासराकडून गाईची काहीही अपेक्षा नसते. वासराला जेवण व सुरक्षा देण्यातच तिला सुख मिळते. या चित्रात दाखविलेले दूध पिणारे वासरू म्हणजे आत्म्याचा शरीरातील दुसरा रोल मी म्हणजे शरीर, मी म्हणजे अहंकार. या रोलमध्ये वासराचा आत्मा त्याच्या शरीराच्या रूपात गाईकडून केवळ घेण्याच्या भावनेत दूध पिण्याचे कर्म करत असतो. वासराला दूध कमी पडले तर ते वासरू गाईला धक्के मारून दूध मिळविते. वासराला गाईची कसलीही काळजी नसते. सांसारिक जीवनात प्रत्येक

व्यक्तीचा आत्मा त्याच्या शरीरात गाय म्हणजे योगी व वासरू म्हणजे अहंकार हे दोन्ही रोल करत असतो. महत्त्वाचे म्हणजे सांसारिक जीवनात मी म्हणजे योगी व

मी म्हणजे अहंकार या दोन्ही भूमिका उत्कर्ष व प्रगती करण्यासाठी महत्त्वाच्या व आवश्यक असतात व सांसारिक जीवनात सुख, यश, समृद्धी व सर्वांगीण विकास साधण्यासाठी आत्म्याच्या या दोन्ही भावनांमध्ये संतुलन मिळवणे आवश्यक असते.

**१८) आमच्या जिवंत अस्तित्वाचा तिसरा महत्त्वाचा घटक** म्हणजे आमच्या शरीरात आमच्या जन्मापासून आमच्या मृत्यूपर्यंत आमच्या आत्म्याला सदैव सोबत करणारा परमात्मा.

**उदाहरणार्थ** : बाजूच्या चित्रामध्ये ईश्वराला आपण सर्वशक्तिमान परमेश्वर, विश्वरूप परमात्मा, परमात्मा, अशा विविध नावाने देखील संबोधितो. ईश्वर या संपूर्ण विश्वाचे नियंत्रण व संचालन आपल्या विश्वरूप परमात्मा या स्वरूपात करत असतात. ईश्वराचे विश्वरूप परमात्मा हे रूप आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी, परमात्मा म्हणून आपल्या आत्म्याला सदैव आपल्या शरीरात सोबत करत असतात.



परमात्मा म्हणजे स्वतःच्या आवडत्या इष्ट देवतेचे (आराध्य देवतेचे) विश्वरूप स्वरूप

(संदर्भ पृष्ठ ५३ पाहावे)

आमच्या शरीरातील परमात्मा आम्हाला आमच्या इष्टदेवतेच्या स्वरूपात स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव व अनुभूती देत असतात. याप्रकारे आमच्या जिवंत शरीरातील आमचा आत्मा, आमच्यातील अहंकार व आमची इष्ट देवता या तिघांच्या साह्यानेच जन्मापासून मृत्यूपर्यंत आमचे सांसारिक जीवन चालू राहते. अगदी जीव-जंतू, पशू-पक्षी, प्राणी, जलचर अशा सर्वांसाठी या तीन गोष्टी कॉमन (सर्वसामान्य) आहेत.

**१९) आमच्या जिवंत अस्तित्वाचे या जगात प्रयोजनच काय आहे?** भगवद्‌गीतेचा अभ्यास करताना एक मुख्य प्रश्न असाही येतो की, आत्म्याचे

शरीराच्या रूपात या भौतिक जगात येण्याचे प्रयोजनच काय आहे? या प्रश्नाचे उत्तर समजल्यास भगवद्गीतेतील सर्व गोष्टींचा उलगडा पटापट होतो व त्या सर्व ज्ञानाची अनुभूती पण येते. या प्रश्नाचे सरळ उत्तर असे आहे की, ईश्वराने हे भौतिक जग तीन प्रकारच्या गुणशक्तींनी निर्माण केलेले आहे. आणि ईश्वर स्वतः विश्वरूप परमात्मा या विशेष स्वरूपात या जगात उपस्थित राहतात. या तीन गुणशक्ती, तमोगुण, रजोगुण आणि सत्त्वगुण या नावाने संबोधल्या जातात. या जगाची दृढता, सामर्थ्य आणि स्थिरता, म्हणजे तमोगुण शक्ती होय. या जगाची गतिशीलता म्हणजे रजोगुण शक्ती होय. या दोन्ही शक्तीच्या संतुलनातून ईश्वराने हे जग निर्माण केले आहे. तमोगुण शक्ती आणि रजोगुण शक्ती यांचा समतोल साधून हे जग निर्माण करणाऱ्या तिसऱ्या शक्तीचे नाव सत्त्वगुण शक्ती आहे.

भौतिक जगाच्या या तीन गुणशक्तींमध्ये परस्पर प्रमाण व संतुलन राखणे हे या जगाप्रती परमेश्वराचे उत्तरदायित्व आहे व त्या उत्तरदायित्वाचाच एक भाग म्हणून ईश्वर त्यांचा स्वतःचा अंश भौतिक शरीराच्या रूपात या जगात पाठवितात. ईश्वराच्या या अंशालाच आत्मा असे म्हणतात. याला कोणीही अपवाद नाही.

**हेच या जगात आमच्या जिवंत अस्तित्वाचे खरे प्रयोजन आहे. हे जाणण्याची प्रक्रिया म्हणजेच भगवद्गीतेचे ज्ञान म्हणजेच राजयोग साधना.**

**उदाहरणार्थ :** बाजूच्या चित्रामध्ये विश्वातील ३ गुणशक्तींचे संतुलन व ईश्वराच्या योगमाया शक्तींद्वारे त्यांचे नियंत्रण दाखविले आहे.

या चित्रामध्ये दाखवल्याप्रमाणे या जगाच्या तीन गुणशक्तीं मधील तमोगुण शक्तीचे संतुलन ठेवण्यासाठी, प्रत्येक व्यक्तीला शरीर व स्वधर्म दिलेला आहे. आमचे स्थूल शरीर आमच्यातील तमोगुण शक्ती आहे.

प्रतिमा : ईश्वराशी एकरूप असलेल्या योगमाया शक्तीचे निराकार आणि साकार स्वरूप जे भौतिक विश्व/प्रकृतिचा अहंकार, सत्त्वगुण, रजोगुण व तमोगुण ऊर्जा शक्ती (माया) ची निर्मिती करते.




ईश्वराची योगमाया शक्ती, जिची भौतिक विश्वामध्ये श्री आदिशक्ती, श्री दुर्गामाता, श्री अंबामाता, श्री महालक्ष्मी माता तसेच सर्व इष्ट देवतांच्या स्वरूपात आराधना केली जाते. (सर्व देवतांची निराकार आणि साकार स्वरूपातील एक प्रातिनिधिक प्रतिमा.)

(संदर्भ पृष्ठ ४६ पाहावे)

या जगाच्या रजोगुण शक्तीचे संतुलन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला स्वधर्मानुसार मन व कर्तव्य कर्मे दिलेली आहेत व या जगाच्या सत्त्वगुण शक्तीचे संतुलन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला बुद्धी दिलेली आहे. आमच्यातील सेवाभाव, इतरांच्या उन्नती व सुखासाठी त्यांना मदत करण्याची वृत्ती सत्त्वगुण दर्शविते.

शरीराच्या रूपात आपल्या इष्टदेवतेशी योग साधण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला सेवाभाव दिलेला आहे. सत्य असे आहे की, ज्याप्रमाणे आपल्या शरीराचे सर्व अवयव आपापल्या परीने फक्त आणि फक्त शरीराची सेवा करतात व त्या सर्व अवयवांचे सुख आणि सुरक्षा पाहण्याचे काम मुख्य शरीर आपल्याकडे घेते. तसेच शरीराच्या रूपात वावरणाऱ्या सर्व आत्म्यांना नियतीकडून मिळालेला स्वधर्म व त्या अंतर्गत आलेल्या जबाबदाऱ्यांनुसार आपापल्या कर्तव्यकर्मांनी ईश्वराची त्यांच्या त्यांच्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेच्या स्वरूपात सेवा करण्याची जबाबदारी असते. शरीराच्या रूपात कर्म करणाऱ्या आत्म्याचे सांसारिक यश, सुख व सुरक्षा पाहण्याची जबाबदारी ईश्वर स्वतःकडे घेतात. त्यामुळे आपल्या शरीराच्या विविध अवयवांप्रमाणे सेवाभाव व सेवावृत्ती ही सर्व आत्म्याची नैसर्गिकता आहे. सृष्टीतील सर्व आत्म्यांचा तो स्वभाव आहे व जबाबदारी पण आहे. याला कोणतीही जिवंत व्यक्ती अपवाद नाही. हेच कारण आहे की, या जगात जिवंत असलेली प्रत्येक व्यक्ती स्त्री असो की पुरुष कोणाला ना कोणाला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सतत सेवा देत असते. हेच कारण आहे की, या जगातील सर्व महापुरुष व सज्जन लोक कोणत्या ना कोणत्या रूपात, समाजाला सेवा देत आलेले आहेत व देत राहतात.

या भौतिक जगाची निर्मिती ईश्वराने केलेली आहे. त्यामुळे या जगात सेवा म्हणून आपले कर्तव्यकर्म केल्यास आत्म्याचा ईश्वराशी सहजच संपर्क राहतो. त्यामुळे सांसारिक आयुष्यात ईश्वराच्या निर्मितीला कोणत्या ना कोणत्या प्रकारे सेवा देणे, किंवा ईश्वराची सरळ भक्ती करणे यात भेद नाही. परंतु, जीवनात कर्म करणे अनिवार्य असल्यामुळे आपल्या कर्तव्यकर्मांद्वारे ईश्वराच्या निर्मितीत सेवा देणे ही सांसारिक जीवनातील आपल्या इष्टदेवतेची सर्वोच्च भक्ती आहे. तसेच, ज्याप्रमाणे लहान मुलाला सतत आईच्या सहवासात राहावयाचे असते, तसेच

आत्म्याला सुद्धा, या भौतिक जगात शरीराच्या रूपात सतत ईश्वराच्या सहवासात राहावयाचे असते, आणि शरीराच्या रूपात असलेल्या आत्म्याला ते फक्त त्याच्या सेवाभावनेतूनच प्रकट करता येते.

सांसारिक जीवनात आपल्याला वेळ व काळानुसार मिळणारा स्वधर्म व त्या अंतर्गत येणारी कर्तव्यकर्मे आपणच पूर्व जन्मात केलेल्या स्वतःच्या बऱ्या-वाईट, बरोबर-चूक कर्म करण्याच्या पद्धतीवर आधारित असतात. त्यामुळे त्यांच्याबद्दल तक्रार करणे चुकीचे असते व त्याचा उपयोग पण होत नाही. उलटपक्षी स्वधर्म व कर्तव्यकर्म या जन्मापासून बिनासायास मिळणाऱ्या दोन्ही गोष्टींचा साधन म्हणून वापर शिकणे जीवनात यश व सुख निर्माण करते.

**सारांश –** रोजच्या जीवनात प्रत्येक व्यक्तीत असलेल्या सेवाभावने बरोबरच प्रत्येक व्यक्तीकडे जन्मापासून मृत्यूपर्यंत नियतीकडून येणारा स्वधर्म व त्यानुसार येणारी कर्तव्यकर्मे अशी दोन महत्त्वपूर्ण साधने असतात. त्यातील साधन क्रमांक १ म्हणजे रोजच्या जीवनात आपण करत असलेली विविध कर्मे. गीतेच्या भाषेत याला आपले **कर्तव्यकर्म** असे म्हणतात. तसेच साधन क्रमांक २ म्हणजे रोजच्या जीवनातील आपल्या जबाबदाऱ्या. गीतेच्या भाषेत याला आपला **स्वधर्म** असे म्हणतात.

त्याचप्रमाणे रोजच्या जीवनात प्रत्येक व्यक्तीकडे त्याच्या स्वधर्मानुसार कर्तव्य कर्मे करण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण शक्ती पण असतात. त्यातील शक्ती क्रमांक १ म्हणजे त्याच्या **इष्ट देवतेकडून मिळणारी शक्ती** व शक्ती क्रमांक २ म्हणजे व्यक्तीच्या **अहंकाराची शक्ती**.

या पाचही गोष्टींचा संयुक्तिक वापर करत सांसारिक जीवनात प्रत्येक व्यक्ती **मी म्हणजे अहंकार (शरीर) व मी म्हणजे योगी (आत्मा)** अशा **दोन भावना** किंवा भूमिकेत आपले स्वतःचे आयुष्य व्यतीत करत असते. याला कोणीही अपवाद नाही. लक्षात घेणे की, आपल्या अहंकाराची शक्ती म्हणजेच आपली जिद्द; आपली नेटाने विविध कर्मे करण्याची प्रवृत्ती.

**वरील सर्व पाचही गोष्टी प्रत्येक व्यक्तीस त्याच्या जन्मापासूनच आपोआप प्राप्त होतात.** या पाचही गोष्टींबद्दल आपण कोणावरही अवलंबून नसतो. उदा. जसे आपल्याला मिळत असलेला सूर्याचा प्रकाश, हवा, आकाश

इत्यादींवर आपण कोणावरही अवलंबून नसतो.

या पुस्तकात राजयोगाची साधना करण्याच्या दृष्टीने आपले कर्तव्यकर्म, आपला स्वधर्म, आपली इष्ट देवता यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. तसेच अहंकार म्हणजे काय याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण व उदाहरणासहित अहंकाराची व्याख्या केलेली आहे. तसेच आपल्या अहंकाराचा सेवाभावनेतून सर्वांगीण प्रगतीसाठी सृजनशील उपयोग कसा करावा हे दर्शविले आहे. जीवनातील वरील पाचही अतिमहत्त्वाच्या गोष्टींकडे आपला दृष्टिकोन निष्काळजी असतो म्हणूनच सांसारिक जीवनात सुख-दुःख, यश-अपयश अशी मिश्र फळे मिळतात.

**२०) राजयोग साधनेचे मुख्य सूत्र** : आता भगवद्गीतेतील या योगसूत्राच्या साधनेची माहिती करून घेऊ.




(संदर्भ पृष्ठ ४२ पाहावे)

बाजूच्या चित्रामध्ये भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे मुख्य सूत्र सांगितलेले आहे.

श्रीमद्भगवद्गीतेतील हे सूत्र सनातन वैदिक धर्माची मूळ शिकवण आहे. आपल्या स्वधर्माप्रमाणे, आपले कर्तव्यकर्म आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून करणे. या सूत्रातील स्वधर्म कर्तव्यकर्म व इष्ट देवतेची सेवा या तीनच गोष्टी, सांसारिक जीवनात, प्रगतीसाठी महत्त्वाच्या आहेत. या सूत्रात संपूर्ण श्रीमद्भगवद्गीतेतील सांसारिक जीवनासाठीचे सार आहे. संपूर्ण श्रीमद्भगवद्गीतेतील सर्व श्लोक हेच सूत्र स्पष्ट करतात. संपूर्ण भगवद्गीतेतील सर्व योग साधनांचा हे सूत्र आधार आहे व सर्व ७०० श्लोकांमधील ते अंतर्निहित ज्ञान आहे. जसा एखाद्या सुंदर हारातील खरा आधार, त्या हारातील न दिसणारा दोरा असतो. तसेच हे सूत्र सांसारिक जीवनाचे खरे मार्गदर्शक सूत्र आहे. या सूत्रातील आपला स्वधर्म म्हणजेच आपल्या जन्मापासूनच आपल्याला मिळणाऱ्या जबाबदाऱ्या, म्हणजेच आपली कर्तव्ये. कर्तव्य कर्म म्हणजे आपल्या जबाबदाऱ्यांनुसार येणारी विविध कर्मे व इष्ट देवता म्हणजे आपली श्रद्धा व आपला विश्वास यानुसार असलेली आपली मुख्य उपास्य देवता!.

**“आपल्या स्वधर्माप्रमाणे आपली कर्तव्य कर्मे**
**आपल्या इष्ट (उपास्य, आराध्य) देवतेची सेवा म्हणून करणे.”**

“हे सूत्र जीवनात, यश, संपत्ती, स्थैर्य मिळवण्यास गाईडेड मिसाईलसारखे कार्य करते.” याचे मुख्य कारण म्हणजे वर वर समजून न येणाऱ्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील या सूत्राला ईश्वराने भौतिक जगातील ईश्वराच्या सर्व रूपातील इष्ट/आराध्य उपास्य देवी देवतांच्या शक्तींचे बळ दिलेले आहे. **महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या स्वधर्माप्रमाणे आपले कर्तव्य कर्म आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून करणे.** या भक्तियुक्त कर्मयोग साधनेच्या सूत्रातील सांगितलेल्या तिन्ही गोष्टी ईश्वराकडून प्रत्येक व्यक्तीला, नवजात शिशु असो, लहान मूल असो, विद्यार्थी असो, तरुण असो, गृहस्थ असो, ज्येष्ठ नागरिक असो, स्त्री असो, पुरुष असो, अशा सगळ्यांनाच प्रकृतीकडून विनासायास मिळालेल्या असतात व वेळोवेळी स्थितीप्रमाणे व आवश्यकतेनुसार सहजरीत्या आपोआप मिळत राहतात.

या सूत्रात सांगितलेल्या तिन्ही गोष्टींवर या जगात कोणीही व्यक्ती कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीवर किंवा कोणत्याही बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतो. याचा सरळ अर्थ असा आहे की, भक्तियुक्त कर्मयोग साधना, अंगीकारण्यासाठी आपल्याला कोणावर सुद्धा अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही.

**२१) या योग साधनेस ईश्वराने मानवाला इष्ट देवतेच्या स्वरूपात दोन वरदाने दिलेली आहेत.**

**पहिले वरदान** असे आहे : भगवद्‌गीता अध्याय ९, श्लोक ३१ मध्ये स्पष्ट झालेले आहे.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्त: प्रणश्यति ।। ३१।।

या श्लोकाद्वारे भगवान श्रीकृष्ण घोषित करतात की, भक्तियुक्त कर्मयोग साधना करणारी व्यक्ती लवकरच शुद्ध, शांत आणि पवित्र बनते ! हे अर्जुना, निर्भीडपणे सांग की, भक्तियुक्त कर्मयोग साधना करणारा कधीही नाश पावत नाही, तो कधीच अपयशी होत नाही. मी सदैव समर्पित भक्तियुक्त कर्मयोग साधकाच्या बाजूने आहे!

(धर्मात्मा : स्वधर्मानूसार प्राप्त झालेले कर्तव्य कर्म ईश्वरासाठी करणारी व्यक्ती) या योग साधनेस दिलेले **दुसरे वरदान :** – भगवद्‌गीता अध्याय ९, श्लोक २२ मध्ये स्पष्ट झालेले आहे.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जना: पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। २२।।

या श्लोकाद्वारे भगवान श्रीकृष्ण घोषित करतात की, जे लोक अनन्य भक्ती म्हणजे समर्पित मन आणि समर्पित बुद्धीने भक्तियुक्त कर्मयोग साधनेद्वारे माझ्याशी संपर्क ठेवतात, त्यांनी मिळविलेल्या यशाचे मी संरक्षण करतो. आणि त्यांना अधिक यश साध्य करण्यात मदत करतो. मी सदैव त्यांच्या सोबत असतो. (भक्तियुक्त कर्मयोग साधकाच्या भौतिक सुख, संपत्ती आणि आध्यात्मिक समृद्धीची मी काळजी घेतो/ देखरेख करतो!).

**२२)** वरील प्रकारे भक्तियुक्त कर्मयोग साधना केल्यास, आपली इष्ट देवता आपले संचित कर्म व प्रारब्ध कर्म अशा प्रकारे नियंत्रित करते की, जीवनात आपला उत्कर्ष चालू राहतो, त्यामुळे सुख व सुखांची अनुभूती मिळते. पुस्तकात मोबाईल सेट व आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या कार्यपद्धतीचे उदाहरण घेऊन हे समजाविले आहे.

**२३)** लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की, जगातील महापुरुषांचे सर्व कर्तृत्ववान स्त्री–पुरुष ज्यांनी ज्यांनी आपापल्या क्षेत्रात यश समृद्धी मिळवलेली आहे, त्यांच्या लाईफ प्रोफाईलचा विचार केल्यास असे लक्षात येते की, त्या सर्वांनी आपल्या जीवनात त्यांच्या जबाबदाऱ्यांनुसार त्यांच्या कर्तव्यांनुसार रोजच्या जीवनात आपली कर्तव्यकर्मे ईश्वराप्रती सेवाभावनेने केलेली आहेत व त्या सर्व लोकांच्या सुखाची व यशाची पूर्ण जबाबदारी ईश्वराने घेतलेली आहे.

सध्याच्या काळातील यशस्वी लोकांच्या बाबतीत पण ही गोष्ट सत्य आहे.

**२४)** अलीकडच्या काळातील आपल्या सर्वांना परिचित असलेले दोन महापुरुष आपण भक्तियुक्त कर्मयोग साधनेची श्रेष्ठता स्पष्ट करणारी रोल मॉडेल्स म्हणून पाहू शकतो.

पहिले रोल मॉडेल म्हणजे छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे जीवनदर्शन व चरित्र अवलोकन करावे. अलीकडच्या काळातील छत्रपती श्री शिवाजी महाराज

भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे सर्वांगीण व परिपूर्ण आदर्श (परफेक्ट रोल मॉडेल) आहेत. छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे खालील वाक्य भक्तियुक्त साधकास मार्गदर्शक आहे. **''हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा !** आम्ही निमित्त मात्र आहोत ! आम्ही या राज्यासाठी फकिरी पत्करली आहे. जे आम्हास अनुकूल असतील त्यांनी आमच्या बरोबर राहावे!'' हे वाक्य म्हणजेच राजयोग सूत्राचा व्यावहारिक अर्थ !!



(संदर्भ पृष्ठ ४९ पाहावे)

श्री छत्रपतींनी आपल्या आयुष्यात **हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा** हा शब्दप्रयोग करून आपल्या बरोबर असलेल्या सर्वांच्या इष्ट देवतेचे एकीकरण दाखविले व कर्तव्य कर्म ईश्वराची सेवा म्हणून करण्याचे संस्कार प्रजेत रुजविले. आपल्या स्वतःचा स्वधर्म म्हणजे क्षत्रिय धर्माप्रमाणे आपले कर्तव्य कर्म म्हणजेच प्रजेचे संरक्षण व प्रजेची उन्नती याकडे लक्ष दिले. छत्रपतींच्या चरित्राचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट दिसते की, त्यांच्यावर आलेल्या सर्व संकटांत त्यांना या योग साधनेस ईश्वराने दिलेल्या दोन्ही वरदानांचा अनुभव मिळाला.

**२५)** दुसरे रोल मॉडेल म्हणजे भारताचे आजचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेब. त्यांच्या जीवनाचा मागच्या २०-२२ वर्षांचा अभ्यास केला तर समजून येते की, ते सुद्धा भक्तियुक्त कर्मयोग सूत्राचे तंतोतंत पालन करतात.



(संदर्भ पृष्ठ ५० पाहावे)

देशाचे पंतप्रधान या नात्याने राष्ट्राचा सर्वांगीण विकास करणे हा त्यांचा स्वधर्म आहे. त्यानुसार ते त्यांची सर्व कर्तव्य कर्मे पूर्ण श्रद्धा, विश्वास व

निष्ठेने करतात व ते सर्व सेवाभावनेतून करतात. देशातील प्रजेत सुद्धा आपापली कर्तव्य कर्मे करत असताना लोकांमध्ये त्यांच्या त्यांच्या इष्ट किंवा आराध्य देवतांच्या प्रती आस्था स्थिर होण्यासाठी श्री. मोदीसाहेब सर्व तीर्थस्थळांचे व तेथील ईश्वराच्या स्वरूपाचे पुररूज्जीवन करत आहेत. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर, उज्जैनचे श्री महाकालेश्वर, वाराणशीतील काशी विश्वनाथ मंदिर, केदारनाथ, विविध देवींची मंदिरे या सर्वांचा जीर्णोद्धार हे सर्व श्री. मोदीजी देशात करत असलेल्या राजयोग सूत्राची साधना व पुनर्स्थापनाच दर्शविते.

त्यांच्यावर टोकाची टीका करणारे सर्व निष्प्रभ ठरतात व मोदींचा विजय होताना दिसतो. मागील २०-२२ वर्षात उत्तरोत्तर त्यांची प्रगतीच होत आलेली आहे. त्यांच्या या राजयोग साधनेमुळे राष्ट्राची सुद्धा उन्नती व सर्वांगीण विकास होत आहे. त्यांच्या जीवनात त्यांना या राजयोग साधनेस देण्यात आलेल्या दोन्ही वरदानाचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

**२६) छत्रपती श्री शिवाजी महाराज व पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी साहेब** या दोघांच्या दैनंदिन जीवनात भक्ती आणि कर्म यांचे एकत्रीकरण झालेले दिसते व ते एकत्रीकरण करण्यासाठी राजयोग सूत्रात सांगितलेला सेवाभाव त्यांच्या मध्ये स्पष्टपणे दिसतो. दोघांच्याही जीवनात आपली कर्मे ईश्वरासाठी केली पाहिजेत अशा भावना व विचार स्पष्टपणे दिसतात.

**२७) या साधनेबद्दलची घोषणा व हमी..!! :** पुस्तकात विशद केलेल्या भक्तियुक्त कर्मयोगाची अनुभूती येण्यासाठी आपल्या इष्ट देवतेस ९१ दिवसापर्यंत रोज सायंकाळी दिवा लावणे. त्यामुळे ही योग साधना आपल्या व्यक्तिमत्त्वात आपोआप आपली इष्ट देवता जागृत करेल. जीवनात प्रगती व सुखाची अनुभूती येईल व सर्वांगीण विकास व उत्कर्ष सुरू होईल. ही अनुभूती म्हणजेच पुस्तकात निर्देशित केलेल्या चक्र ६ व चक्र ७ याची आपल्या व्यक्तिमत्त्वात जागृती होणे. म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग साधनेस ईश्वराने दिलेल्या दोन वरदानांची आपल्यास खात्री पटणे !

**९१ दिवस या संख्येबद्दल :** भगवद्गीतेचा अभ्यास सुरू करेपर्यंत जीवनात मला कोणीही मनुष्यरूपातील सद्गुरू भेटले नव्हते. वेळही नव्हता. जीवनातील माझे प्रश्न पण अर्जुनासारखेच गहन व गुंतागुंतीचे होते, त्यामुळे

अभ्यास सुरू केल्यावर सरळ भगवान श्रीकृष्णांनाच गुरू म्हणून आवाहन केले. ९१ या संख्येचे महत्त्व मला भगवद्‌गीतेचा अभ्यास सुरू केल्यावर ईश्वरानेच लक्षात आणून दिले आहे. ९१ ही संख्या गीतेतील सांख्य तत्त्वज्ञानातून प्रगट झालेली आहे. त्यातूनच पुढे गॅलेक्सी कंपनीची निर्मिती झाली. त्यातूनच कंपनीचा विकास कसा केला पाहिजे हे लक्षात आले. याची चर्चा साधकाच्या योग्यतेनुसार करता येईल; परंतु साधकांसाठी ते महत्त्वाचे नाही.

**वाचकांसाठी सूचना :** या संख्येकडे व्यर्थ चिकित्सा व तात्त्विक चर्चेत न पडता पॅरासिटामोल घेणे व डोकेदुखी थांबवणे या प्रमाणे समजणे. म्हणजेच रोजच्या सांसारिक जीवनात भक्तियुक्त कर्मयोग साधना अंगीकारणे व जीवनात प्रगती, उत्कर्ष, यश, समाधान मिळवणे. पुस्तकात दर्शविलेला राजयोग तक्ता घरात लावून त्यापुढे रोज सायंकाळी दिवा लावून सुद्धा राजयोग साधना चालू करता येईल. तक्त्यांमधे ईश्वराच्या विश्वरूपातील चित्रात आपली इष्ट देवता पाहणे. भक्तियुक्त कर्मयोग साधना दैनिक जीवनात सुरू करण्यासाठी आपल्या वयानुसार, स्वतःच्या जबाबदाऱ्यांनुसार, स्वतःच्या अधिकारानुसार व आपल्या स्थितीनुसार तक्त्यामधील ६ प्रकारच्या कर्तव्य कर्मांमधून एक किंवा अधिक कर्तव्य कर्मे निवडावीत व त्याप्रमाणे दैनंदिन आयुष्यात वागणूक ठेवावी.

राजयोग तक्ता मधील ६ प्रकारची कर्तव्य कर्मे आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून कशी करणे व त्यासाठी आवश्यक ती मानसिकता व भावना कशी विकसित करावी इत्यादी गोष्टी या पुस्तकात विविध प्रकारे विशद केल्या आहेत.

**२८)** आता आपण सांसारिक जीवनात **भक्ती आणि कर्म याची सांगड** कशी घालायची व त्यासाठी ईश्वराने आमच्या सांसारिक आयुष्यात काय प्रोव्हिजन केलेले आहे व त्याचा कसा उपयोग करावयाचा हे पाहू.

**ईश्वराने केलेले पहिले प्रोव्हिजन (नंबर १) :** म्हणजे ईश्वर स्वतः प्रत्येकाच्या शरीरात त्याच्या इष्ट/ आराध्य, उपास्य देवतेच्या स्वरूपात मार्गदर्शन करण्यासाठी सदैव आत्म्याबरोबर उपस्थित असतात.

**ईश्वराने केलेले दुसरे प्रोव्हिजन ( नंबर २) :** म्हणजे प्रत्येक व्यक्तीस स्त्री असो पुरुष असो जन्मापासूनच प्रेमाची भावना व सेवाभाव दिलेला आहे. याला कोणीही अपवाद नाही.

**ईश्वराने केलेले तिसरे प्रोव्हिजन (नंबर ३) :** म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याचा किंवा तिचा स्वधर्म व त्यानुसार असणाऱ्या कर्तव्य कर्माची जाणीव दिलेली असते. वेळ, काळ व आवश्यकतेनुसार स्वधर्म व कर्तव्य कर्म माहीत होत राहण्याची तजवीज पण केलेली असते. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची कर्तव्यकर्मे करण्यासाठी शरीराच्या रूपात असलेली अहंकाराची शक्ती पण दिलेली असते.

**२९) या सूत्रातील रहस्य काय आहे?** खालील चित्रात दर्शविल्याप्रमाणे स्वधर्म शरीराशी संबंधित आहे म्हणून तमोगुण दर्शवितो व कर्तव्य कर्म रजोगुण दर्शवितो. इष्ट देवतेप्रती सेवाभाव म्हणजे सत्त्वगुणातून ईश्वराशी योग दर्शवितो आणि अशा प्रकारे इष्ट देवतेशी योग साधल्याने आत्म्याच्या दोन्ही भूमिका **'मी म्हणजे योगी आणि मी म्हणजे अहंकार'** यांचे दैनंदिन जीवनात एकत्रीकरण होते व त्यामुळे आपल्याला आपल्या इष्ट देवतेची सेवा करणे शक्य होते व आपल्या इष्ट देवतेला आपले सांसारिक जीवन उन्नत आणि यशस्वी करणे शक्य होते.




(संदर्भ पृष्ठ ४१ पाहावे)

या सूत्राप्रमाणे साधना करणाऱ्या साधकाची इष्ट देवता कशा प्रकारे साधकाचे प्रारब्ध कर्म त्याच्याच संचित कर्म फळांचा उपयोग करून बदलून टाकते ते या राजयोग पुस्तकात सविस्तरपणे स्पष्ट केलेले आहे .

**३०) ईश्वराची आमच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात आमच्याकडून काय अपेक्षा असते?** ईश्वराला याची पूर्ण कल्पना असते की, प्रत्येक आत्म्याला या सांसारिक जीवनात शरीराच्या रूपात कर्म करताना अनेक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे आपल्या इष्ट देवतेच्या स्वरूपात ईश्वराची आपल्याकडून फक्त आणि फक्त एवढीच अपेक्षा असते की, मानवाने सांसारिक आयुष्यात आपली कर्तव्य कर्मे जाणून घ्यावीत व आपल्या क्षमतेप्रमाणे ती करण्याचा प्रयत्न करावा.

**सांसारिक जीवनात शरीराच्या रूपात विविध कर्मे करणाऱ्या आत्म्याला हीच खरी स्वतंत्रता आहे.**

सांसारिक जीवनात आपल्या वयानुसार व स्थितीनुसार योग्य असलेली अशी कर्तव्य कर्मे करण्याबद्दल आपल्याला इष्ट देवतेकडून संकेत मिळत राहतात. आपण नुसता प्रयत्न करत असलो तर ते सुद्धा ईश्वराला पुरेसे असते व त्यासाठी सुद्धा आपल्याला ईश्वराचे प्रेम व मार्गदर्शन मिळणे चालू होते व त्याची आपल्याला जाणीवसुद्धा होते.

**३१) सांसारिक जीवनातील सहा प्रकारची कर्तव्य कर्मे उदाहरणांसहित :**

सांसारिक जीवनासाठी अभिप्रेत असलेली ६ प्रकारची कर्तव्य कर्मे दाखविली आहेत. राजयोग साधना सुरू करण्यासाठी इष्टदेवतेच्या संदर्भातील पहिल्या कर्तव्यकर्मा बरोबर इतर कोणतेही एक कर्तव्य कर्म निवडावे व आपल्या क्षमतेनुसार ही योगसाधना सुरू करावी.

(१) **पहिले कर्तव्यकर्म :** आपल्या इष्ट (आराध्य) देवतेप्रती समर्पित भावना विकसित करण्यासाठी स्वतःहून करण्यात येणारे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** वर्षभरातून एकदातरी आपल्या कुलदेवीचे दर्शन घेणे. रोज देवाला दिवा लावणे. लहान मुला मुलींवर संध्याकाळी रामरक्षा, शुभम करोती, हरिपाठ, हनुमानचालिसा वगैरे स्तोत्र म्हणण्याचे संस्कार घालणे. मुला मुलींवर लहानपणापासूनच मोठ्यांना नमस्कार करण्याचे संस्कार व मोठ्यांना आदर देण्याचे संस्कार करण्यावर लक्ष देणे. हे आई-वडील, शिक्षक व सद्गुरूंचे लहान मुला मुलींसाठीचे कर्तव्य आहे.

(२) **दुसरे कर्तव्यकर्म :** आपल्या स्वतःच्या भौतिक जीवनाच्या विकासासाठी लौकिक शैक्षणिक आणि आध्यात्मिक जबाबदाऱ्यांच्या दृष्टीने करण्यात येणारे स्वतःचे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** विद्यार्थीदशेत प्रत्येक मुलामुलीने आपल्या स्वतःच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, हे त्यांचे कर्तव्य कर्म आहे व त्यासाठी विद्यार्थीदशेत मुलांवरील करण्यात येणाऱ्या संस्कारांना अतिशय महत्त्व आले. हे पण आई-वडील, शिक्षक व सद्गुरूंचे लहान मुलांसाठीचे कर्तव्य आहे.

③ **तिसरे कर्तव्यकर्म :** आपल्या कौटुंबिक व पारिवारिक विकासासाठी करण्यात येणारे स्वतःचे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** आपल्या मुलांच्या संस्कारांकडे लक्ष देणे.

④ **चौथे कर्तव्यकर्म :** आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक पात्रता प्राप्त करण्यासाठी करण्यात येणारे स्वतःचे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** व्यावसायिक जबाबदाऱ्यांच्या बाबतीत करावयाचा अभ्यास.

⑤ **पाचवे कर्तव्यकर्म :** आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांच्या संदर्भात करण्यात येणार आपले स्वतःचे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** सामाजिक उपक्रमात जमेल त्या पद्धतीत आपल्या क्षमतेनुसार सेवा देणे.

६ **सहावे कर्तव्यकर्म :** आपल्या राष्ट्रीय जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी करण्यात येणारे स्वतःचे प्रयत्न.

**उदाहरणार्थ :** देशाचा विकास करणाऱ्या लीडरकडे पाहून राजनीतिक पार्टीला मतदान करणे मतदान न चुकवणे.

**३२)** ईश्वराने या सांसारिक जीवनात स्वधर्मानुसार येणारी कर्तव्य कर्मे करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला स्त्री असो, पुरुष असो, विद्यार्थी असो, गृहस्थ असो की, ज्येष्ठ नागरिक असो, जन्मापासूनच दोन महत्त्वपूर्ण अशा शक्ती पण दिलेल्या आहेत. त्या दोन शक्तींपैकी पहिली शक्ती म्हणजे आपल्या इष्ट देवतेकडून आपल्याला मिळणारी शक्ती व दुसरी शक्ती म्हणजे आपल्या स्वतःच्या अहंकाराची शक्ती. सांसारिक जीवनात सुख, यश, संपत्ती, समाधान वगैरे मिळण्यासाठी दोन्ही शक्तींचे स्वरूप व त्यांचा उपयोग समजून घेणे आवश्यक असते.

त्या दोन शक्तींपैकी प्रथम शक्ती म्हणजे : **आपल्या इष्ट देवतेकडून आपल्याला मिळणारी शक्ती.** ही शक्ती या जगातील सर्वोच्च शक्ती आहे व या शक्तीत **'अशक्य ते शक्य'** करण्याचे सामर्थ्य आहे. इष्ट देवतेच्या या शक्तीला **योगमाया शक्ती** असे म्हणतात. परमात्म्याची आत्म्याशी बिनशर्त वचनबद्धता असल्यामुळे या जगात प्रत्येक व्यक्तीला कर्तव्य कर्म करत असताना त्याच्या इष्ट देवतेची शक्ती व कर्तव्य कर्म करण्यासाठी आवश्यक असे ज्ञान

जन्मापासून मृत्यूपर्यंत मिळतच राहते. त्याला कोणीही अपवाद नाही. फरक एवढाच असतो की, इष्ट देवतेची सेवा म्हणून कर्तव्य कर्म करत असलेल्या व्यक्तीस त्याच्या इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीची, मदतीची जाणीव होते व अनुभूती पण असते.

**उदाहरणार्थ :** नवजात मूल जन्माला आल्या आल्या स्वतःचे शरीर जगवणे हा त्या बाळाचा प्रथम स्वधर्म असतो. त्या स्वधर्मानुसार त्याचे कर्तव्य कर्म हवा, पाणी व जेवण मिळविण्यासाठी प्रयत्न करणे असे असते. ते बाळ आपल्या क्षमतेनुसार प्रयत्न चालू करते. लगेचच ईश्वराकडून त्या बाळाला श्वास घेण्याचे ज्ञान व शक्ती मिळते. तसेच आपली तहान व भूक भागवण्यासाठी ईश्वराकडून त्या बाळाला आईचे दूध ओढून घेण्याचे/सक करण्याचे ज्ञान व शक्ती पण लगेचच मिळते, परंतु श्वास घेण्याचे व आईचे दूध ओढून घेण्याचे बाळाचे कर्तव्य कर्म बाळालाच करावे लागते, याचाच सरळ अर्थ म्हणजे कर्तव्य कर्मे स्वतःमध्येच ईश्वराची भक्ती व पूजा आहे. प्रत्येक व्यक्तीची इष्ट देवता व्यक्तीला कर्तव्य कर्म करणासाठी शक्ती पण देते व कर्तव्य कर्म केल्याचे फळपण देतेच देते. या प्रमाणे जन्म झाल्यावर पंचमहाभूतांनी बनलेल्या शरीराचे पंचमहाभूतांचाच वापर करून आपले शरीर जगविण्यासाठीचे प्रथम कर्तव्यकर्म करण्यासाठी आवश्यक असे ज्ञान, शक्ती व मदत बाळाला ईश्वराकडूनच मिळत असते. या जगात ही गोष्ट ईश्वराची सर्व जीवात्म्यांसाठी असलेली वचनबद्धता दर्शविते.

**श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे व्यावहारिक ज्ञान समजावून घेण्यासाठी आपल्या इष्ट, आराध्य, उपास्य देवतेचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.** आपली इष्ट देवता म्हणजे आपली श्रद्धा आणि आपला विश्वास यांच्यानुसार असलेली आपली उपास्य देवता. आपली इष्ट देवता पण आपल्याला आपल्या जन्मापासूनच आपले आई-वडील परिवार यांच्याकडून विनासायास मिळालेली असते. याचे सरळ उदाहरण म्हणजे, आमच्या जन्मापासूनच माहीत होणारी आमची कुलदेवता.

आपली उपास्य देवता, कुलदेवता, तसेच आपल्यातील परमात्मा, परमेश्वर, ईश्वर यामध्ये तिळमात्र भेद नाही. त्याचप्रमाणे जगातील सर्व इष्ट देवता, आराध्य देवता किंवा उपास्य देवता, आपली कुलदेवता या सर्वांत देखील काहीही भेद

नाही. ती सर्व ईश्वर, परमपिता परमेश्वर किंवा विश्वरूप परमात्म्याचे एक विशिष्ट स्वरूपच असते. आपली कुलदेवी योगमाया शक्तीचे स्वरूप दर्शविते.

खालील चित्रामध्ये ईश्वर, परमेश्वर, परमात्मा यांचे विश्वरूप परमात्मा स्वरूप दाखवले आहे. हे चित्र सर्व इष्ट देवतांचे विश्वरूप परमात्मा स्वरूपात एकरूपता दर्शविते. विश्वरूप परमात्मा प्रत्येक व्यक्तीसोबत एका विशिष्ट स्वरूपात स्वतःचे इष्ट (आराध्य) देवतेच्या रूपात सदैव उपस्थित असतात.

**परमात्मा म्हणजे स्वतःच्या आवडत्या इष्ट (आराध्य, उपास्य) देवतेचे विश्वरूप स्वरूप**



(संदर्भ पृष्ठ ५३ पाहावे)

प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे आवडते इष्ट (आराध्य) देव/देवता विश्वरूप परमात्म्याचे एक विशेष रूपच असते. माणसाची इष्ट (आराध्य) देवता आणि विश्वरूप परमात्मा यात काहीही फरक नाही. याचाच सरळ अर्थ असा आहे की, भगवान महादेव, श्री दुर्गा माता, श्री गणेश, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, श्री हनुमान, माता महालक्ष्मी देवी, श्री विष्णू भगवान, श्री स्वामीनारायण, श्री गुरुदेव दत्तप्रभू, शीख धर्माचे श्री गुरुग्रंथ साहिबजी, जैन धर्माचे भगवान श्री महावीर, बुद्ध धर्माचे भगवान श्री बुद्ध तसेच आजच्या काळातील श्री स्वामी समर्थ, श्री गजानन महाराज, श्री साईबाबा तसेच या सर्वांची विविध रूपे यांत देखील तिळमात्र भेद नाही. ही सर्व एकाच विश्वरूप परमात्म्याची विभिन्न रूपे आहेत. ती सर्व विविध व्यक्तींसाठी त्यांच्या त्यांच्या प्रकृतीप्रमाणे इष्ट देवता म्हणून मार्गदर्शन व नियंत्रण करतात.

**३३)** हेच कारण आहे की, **आमच्या ऋषीमुनींनी** प्रत्येक इष्ट (आराध्य) देवतेच्या मंदिरात सर्व तीर्थस्थळांवर ईश्वराची इतर रूपातील देवतांची स्थाने सुद्धा सुरक्षित केलेली आहेत.

हेच कारण आहे की, आमच्या ऋषीमुनींनी कोणत्याही इष्ट (आराध्य)

देवतेची पूजा अर्चना करताना शेवटी इतर सर्व देवतांच्या आरत्या म्हणण्याची प्रथा आमच्यावर संस्कारित केलेली आहे. उद्देश एकच, सर्व इष्ट (आराध्य) देवता एकाच परमेश्वराची विविध रूपे असण्याचा भाव आमच्या मनात व आमच्या बुद्धीत स्पष्ट होणे व ते सत्य नेहमीच लक्षात राहणे.

**एका अगदी साध्या उदाहरणातून हे पाहू :** खालील चित्रात दर्शविल्याप्रमाणे एक स्त्री आपल्या आई-वडिलांची मुलगी, आपल्या नवऱ्याची पत्नी, आपल्या बाळाची आई, आपल्या इष्ट देवतेची भक्त व आपल्या सद्गुरूची शिष्य असे विविध रोल एकाच शरीराद्वारे करत असते व ते सर्व रोल पूर्णपणे भिन्न दिसतात, त्या रोलमधे भिन्नता पण असते. पण ती स्त्री एकच असते. त्याचप्रमाणे परमात्मा (ईश्वर) प्रत्येक व्यक्तीला त्याच्या इष्ट देवतेच्या तसेच इतरांच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात अनुभूती देत असतात.


स्त्रीचा आपल्या इष्ट (आराध्य) देवतेशी संबंध


स्त्रीचा आपल्या सद्गुरूंशी संबंध


स्त्रीचा आपल्या वडीलाशी संबंध


स्त्रीचा आपल्या आईशी संबंध


स्त्रीचा आपल्या पतीशी संबंध


स्त्रीचा आपल्या मुलाशी संबंध

(या चित्रांचा संदर्भ : श्री रामानंद सागर यांच्या दूरदर्शन धारावाहिक 'श्रीकृष्ण' येथून घेतलेले आहेत.)

(संदर्भ पृष्ठ ५१ पाहावे)

**३४) सर्व इष्ट देवतांचे विश्वरूप परमात्म्याच्या स्वरूपात एकीकरण :**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी सर्व इष्ट देवतांचे एकीकरण विश्वरूप परमात्म्याच्या स्वरूपात अतिशय स्पष्ट शब्दात सांगितले आहे व दाखवले देखील आहे. सत्य असे आहे की, ईश्वराची जगातील सर्व रूपे भक्तियुक्त कर्मयोग साधकांना या सूत्राच्या सत्यतेची अनुभूती देत असतात. परंतु भगवद्‌गीतेचा दैनंदिन जीवनात उपयोग करण्याच्या दृष्टीने या मुख्य गोष्टीकडेच दुर्लक्ष होते व झाले सुद्धा. त्यामुळे श्रीमद्‌भगवद्‌गीता फक्त भगवान श्रीकृष्णांशीच जोडली गेली व त्यामुळे भगवद्‌गीतेचा आमच्या रोजच्या जीवनातील मोबाईल फोन सारखा वापर झाला नाही व दुर्लक्षित राहिला. भगवान श्रीकृष्णांच्या भक्तांशिवाय इतर देवी-देवतांच्या भक्तांनी भगवद्‌गीतेमधील ज्ञानाकडे लक्ष देणेच सोडून दिले.

**३५)** प्रत्येक व्यक्तीतील स्वतःच्या अहंकाराची शक्ती आणि पुरुषार्थ; वाक्प्रचार/उक्ती : मिथ्या अहंकार काय दर्शविते? या आधी आपण पहिली इष्ट देवेतेकडून येणारी शक्ती पाहिली. **आपल्यातील दुसरी महत्त्वाची शक्ती म्हणजे आपल्या स्वतःच्या अहंकाराची शक्ती.** आपल्यातील अहंकाराची शक्ती म्हणजेच आपली जिद्द, आपली नेटाने विविध कर्मे करण्याची वृत्ती. आध्यात्मिक भाषेत अहंकाराच्या शक्तीला म्हणजे आमच्यातील असलेल्या जिद्दीला **पुरुषार्थ** असे म्हणतात. सर्व संतांनी या अहंकाराच्या शक्तीला **मिथ्या अहंकार** असे म्हटले आहे. कारण की, **ही अहंकाररूपी शक्ती सांसारिक जीवनात सुख, यश आणि समृद्धी मिळवण्यासाठी एकदम बेभरवशाची आहे** म्हणून या शक्तीला **मायाशक्ती** असे सुद्धा म्हणतात. परंतु आजच्या या काळातील वैज्ञानिक प्रगतीत अहंकाररूपी शक्तीचा महत्त्वाचा वाटा झालाय. आजच्या काळातील सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, गुगल, इंटरनेट, आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित स्मार्ट फोन व इतर वैज्ञानिक उपकरणे विश्वाच्या अदृश्य अशा अहंकार रूपी शक्तीचेच दृश्य स्वरूप आहेत व दैनंदिन जीवनाचा आधार झालेले आहेत. त्यामुळे या शक्तीचे महत्त्व नाकारता येत नाही. परंतु या शक्तीची समज व मर्यादा नीट जाणून घेतल्या तर अहंकार रूपी शक्ती सुद्धा या सांसारिक जीवनात यश, सुख, समृद्धी मिळवण्यास फायद्याची ठरते.

**आता अहंकार म्हणजे काय हे समजून घेऊ.** वैज्ञानिक भाषेत अहंकार म्हणजे Attraction आणि Repulsion अशा दोन पूर्णपणे विपरीत गुणांनी बनलेली एक अद्‌भुत व विज्ञानाला सुद्धा माहीत नसलेली अशी शक्ती आहे. Attraction आणि Repulsion अशा दोन पूर्णपणे विपरीत गुणांनी बनलेल्या या शक्तीचा मुख्य अद्वितीय गुण असा आहे की, ही विपरीत स्वभावाची जोडी कधीही एकमेकात विलीन होत नाही किंवा कधीही एकमेकांना सोडतही नाही. परंतु ही जोडी सदैव सह-अस्तित्वात राहते. आपल्यातील विपरीत गुणांच्या या सुप्त दुहेरी स्वभावाच्या शक्तीचीच आपण आपला अहंकार म्हणून अनुभूती घेत असतो. ही विपरीत स्वभाव असलेली अहंकार नावाची शक्तीच या जगातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःची विशिष्ट अशी ओळख देते. ही ओळख : **मी म्हणजे माझा अहंकार, मी म्हणजे माझे शरीर, मी म्हणजे माझी इंद्रिये, मी म्हणजे माझे मन, मी म्हणजे माझी बुद्धी,** अशा मर्यादित स्वरूपात असते. प्रत्येक व्यक्तीतील स्वतःपुरते **मी** आणि **माझे** असे मर्यादित विचार व भावना विपरीत स्वभावाच्या या शक्तीमुळेच असतात. ही अहंकाराची शक्ती अशा प्रकारच्या सर्व धारणा व्यक्तीमध्ये जन्मापासून मृत्यूपर्यंत स्थिर करते व जोपासते. सांसारिक जीवनात व्यक्तीतील अशा मर्यादित विचारांमुळे व भावनांमुळेच प्रत्येक जिवन्त व्यक्तीची हे जग व इतर सर्व जीव स्वतःच्या अस्तित्वापासून वेगळे आहेत अशी समज होत असते.


(संदर्भ पृष्ठः तक्ता क्र.३, पृष्ठ ६०, चक्र क्र. १ : अन्नमय कोष (शरीर), मूलाधार चक्र वाचावे. तसेच पृष्ठ १६१; चक्र क्रमांक १ अन्नमय कोष (शरीर), मूलाधार चक्र वाचावे).

अहंकाराच्या शक्तीच्या प्रभावामुळेच प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या असण्याची म्हणजे स्वतःच्या शरीराची, स्वतःच्या मनाची, स्वतःच्या बुद्धीची मालकी स्वतःकडे घेतो. व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्व टिकून राहण्यासाठी हे आवश्यक आहे. या जगात कोणत्याही व्यक्तीला कर्म करण्यासाठी ही अहंकार नावाची शक्ती आवश्यकच आहे. तिच्या असण्याला पर्याय नाही, परंतु सत्य असे आहे की, प्रत्येक व्यक्तीतील **मी** ची **जाणीव** ही केवळ व्यक्तीतील आत्म्याच्या अस्तित्वामुळेच असते. अहंकार ही केवळ एक शक्ती असल्यामुळे तिला

स्वतःची अशी स्वतंत्र ओळख नसते. आत्मा व परमात्मा अहंकाराच्या शक्तीला विशिष्ट ओळख देतात. अहंकार हे केवळ आत्म्याचे शरीर, मन, बुद्धी यांच्या रूपात कर्म करण्याचे साधन असते. सत्य असे आहे की, या भौतिक जगात आत्म्याला मानवी शरीरात अहंकाराच्या शक्तीमुळे मिळणारी मर्यादित ओळख हे आत्म्याचे या जगात एक बलस्थान आहे. त्यामुळेच प्रत्येक व्यक्तीला कर्तृत्व करण्याची संधी आहे. त्यामुळे अहंकाराच्या शक्तीचा वापर शिकणे सांसारिक जीवनात यश, सुख, समाधान, समृद्धी मिळविण्यासाठी महत्त्वाचे असते. राजयोग साधना नेमके हेच करते.

संदर्भ पृष्ठ : तक्ता क्र.४, पृष्ठ ६१, चक्र क्र. ३ : मनोमय कोष (मन, स्मृती, चित्त) वाचावे तसेच पृष्ठ १६२; चक्र क्रमांक ३, मनोमय कोष (मन, स्मृती, चित्त) वाचावे.

खालील चित्रांमध्ये विश्वाच्या अहंकाराचे दृश्य स्वरूप दर्शविले आहे. पहिल्या चित्रात सर्व ग्रहगोल आपापल्या कक्षेत फिरत आहेत. एकमेकांवर आदळत पण नाहीत व एकमेकांना कायमचे सोडत पण नाहीत. हे त्या सर्वांमधील Attraction आणि Repulsion यांच्या सह-अस्तित्वामुळेच शक्य आहे. दुसऱ्या चित्रात आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील दोन विरुद्ध बाजू दाखविल्या आहेत. आमच्या शरीरात, मनात, बुद्धीत व आमच्या दैनंदिन कर्मांमध्ये सुद्धा दोन विपरीत भाग असतात. त्यांच्या संयोगानेच आमचे मन, बुद्धी व शरीर चालते. तिसऱ्या चित्रात चुंबकातील दोन विरुद्ध ध्रुव दाखविले आहेत. दोघे एकमेकात विलीनही होत नाही व एकमेकांना सोडतही नाहीत.



(संदर्भ पृष्ठ ५२ पाहावे)

**सत्य असे आहे की ईश्वराने अशा या विपरीत गुणांच्या दुहेरी स्वभावाच्या शक्तीच्याच निर्मितीतून आपले भौतिक विश्व निर्माण केले आहे.** त्यामुळे Attraction आणि Repulsion अशा दोन पूर्णपणे विपरीत गुणांनी

बनलेली ही अहंकार रूपी शक्तीच या विश्वाची मूलभूत शक्ती आहे व या विश्वाचा अहंकार आहे. हेच कारण आहे की , सांसारिक जीवनात सर्व विपरीत गोष्टी **'पेअर्स ऑफ आपोझिट्स'** म्हणजे स्त्री-पुरुष, सुख-दुःख, यश-अपयश, दिवस-रात्र, गरम -थंड, चांगले, वाईट, गुण-अवगुण वगैरे वगैरे साथोसाथ असतात.

महत्त्वाचे म्हणजे आमच्या आत्म्याने पण आम्ही आमच्या आईच्या गर्भात असताना प्रथम आमच्यातील या अहंकार रूपी शक्तीचीच निर्मिती केलेली होती. त्यानंतर या विपरीत स्वभावाच्या अहंकाराच्या शक्तीनेच आमचे शरीररूपी यंत्र, आमची सर्व इंद्रिये, आमचे मन व आमची बुद्धी निर्माण केलेली आहे. अहंकाराच्या दोन्ही विपरीत गुणांमध्ये संतुलन राहण्यासाठी आमचे शरीर पण दोन सारख्या विभागात वाटलेले आहे. दोन डोळे, दोन कान, दोन हात, दोन पाय वगैरे, अशा गोष्टी हे सर्व अहंकाराच्या विपरीत स्वभावाच्या शक्तीचे संतुलन करण्याचाच एक भाग आहे. इंटरेस्टिंग म्हणजे आमचा आत्मा श्वास घेतानाच दोन नाकपुड्यांचा उपयोग करतो आणि आमच्या शरीरात येणारा श्वास सुद्धा दोन सारख्या भागात वाटून टाकतो व त्यामुळेच आमच्या शारीरिक अस्तित्वाचे संतुलन राहते. हे कारण आहे की, सांसारिक जीवनात शरीराद्वारे कर्म करणे शक्य आहे. तसेच आमच्या आत्म्याने मनाचे व बुद्धीचे संतुलन ठेवण्यासाठी आमच्या मनात व बुद्धीत सकारात्मक व नकारात्मक अशा भावना व विचार ठेवलेले आहेत. त्यामुळेच आमच्या मनात आणि बुद्धीत सतत सकारात्मक व नकारात्मक भावना व विचार चालू असतात.

हेच कारण आहे की, केवळ अहंकाराने कर्म केल्यास सांसारिक जीवनात यश-अपयश, सुख-दुःख अशी मिश्र फळे मिळतात व आपल्या इष्ट देवतेच्या शक्तीचा आधार घेतला नाही, तर यश मिळण्याची कोणीच गॅरंटी घेऊ शकत नाही. त्यामुळे कुठे ना कुठे मनात इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या शक्तीची जाणीव व महत्त्व बहुतेकांना माहीत असते. पण रोजच्या जीवनात आपल्या इष्ट देवतेकडून शक्ती मिळविण्याकडे नेहमी दुर्लक्ष होते. हे एकदम चुकीचे आहे; परंतु याची जाणीव घरात एखादे अति महत्त्वाचे कार्य निघाले की कुटुंबातील ज्येष्ठ स्त्री-पुरुष व इतर सर्वांनाच होते.

**उदाहरणार्थ :** जेव्हा आपल्याकडे एखादे लग्नकार्य निघते तेव्हा आपल्या सर्वांना एकदम ईश्वराची आठवण येते. कारण की, लग्नकार्यात अडचणी येण्याची शक्यता कोणीच नाकारू शकत नाही व कार्यात आपल्याला बिलकूल अडचणी नको असतात. मग आपण लग्नपत्रिकेत सर्वात वर ठळकपणे आपल्या कुलदेवीचे नाव लिहितो. पहिली पत्रिका कुलदेवीलाच देतो.

सत्य असे आहे की, चांगल्या सुदृढ सांसारिक जीवनासाठी रोजच्या जीवनात इष्ट देवतेच्या शक्तीचे संवर्धन महत्त्वाचे आहे. राजयोग सूत्र नेमके हेच करते.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी **अहंकार रूपी शक्तीला कनिष्ठ शक्ती** असे संबोधिले आहे व या अहंकार रूपी शक्तीचा वापर राजयोग सूत्रात सांगितल्याप्रमाणे आपली कर्तव्यकर्मे आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून करावी असे स्पष्ट शब्दात सांगितले आहे. कारण इष्ट देवतेची दैनंदिन जीवनात शक्ती मिळविण्याचा हा सर्वात सरळ व सोपा उपाय आहे.

**३६) आता स्मार्टफोन, गुगल, इंटरनेट बँकिंग वगैरे वगैरेचा प्रभाव असलेल्या आजच्या जीवनात हे सूत्र वापरण्यात कुठे गफलत होते ते पाहू.**

या सूत्रात नमूद केलेल्या तीन गोष्टींपैकी स्वधर्मानुसार वाट्यास आलेली कर्तव्य कर्मे बहुतेक लोक थोड्याबहुत फरकाने करतच असतात. तसेच आपल्या इष्ट देवतेची सेवा, भक्ती पण सांसारिक जीवनात थोड्याबहुत फरकाने बहुतेक व्यक्ती करत असतात. कारण भक्ती प्रेम करणे ही जीवनाची नैसर्गिकता आहे. आत्म्याचा तो स्वभाव आहे.

**आता या जीवनाचा पॅरॉडॉक्स (विरोधाभास) बघा :** आपली कर्तव्य कर्मे करण्यासाठी आपल्याला जिद्द म्हणजे आपल्या अहंकाराचे बळ आवश्यक असते व आजची सर्व वैज्ञानिक उपकरणे मानवाच्या अहंकाराच्या बळानेच तयार झालेली आहेत. त्यामुळे त्यांच्यात मोलाचे साहाय्य करण्याची ताकद आहे. परंतु पॅरॉडॉक्स (विरोधाभास) असा आहे की, आजची सर्व वैज्ञानिक उपकरणे आमचे शरीर, इंद्रिये, मन आणि बुद्धी या सर्वांना त्या वैज्ञानिक उपकरणांवरच अवलंबून राहण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे मुळात बेभरवशाची असलेली अहंकार रूपी शक्तीच सगळ्यांना श्रेष्ठ वाटायला लागते. त्यामुळे दैनंदिन आयुष्यात इष्ट देवतेशी

म्हणजेच परमात्म्याशी संपर्क ठेवणे महत्त्वाचेच वाटत नाही व जमतही नाही. त्यामुळे आपल्या रोजच्या जीवनात आपल्या इष्ट देवतेकडून मिळणाऱ्या व भरवसा ठेवण्यास योग्य अशा इष्ट देवतेच्या शक्तीची जाणीवच राहत नाही.

सत्य असे आहे की, आपल्यातील अहंकार रूपी शक्ती दोन विपरीत गुणांपासून निर्माण झालेली असल्यामुळे तिला आपल्या इष्ट देवतेच्या शक्तीचे पाठबळ नसेल तर, हमखास यश व सुख मिळण्याची बिलकूल खात्री देता येत नाही. उलटपक्षी जर व्यक्तीचा कर्म करण्यामागील उद्देश सेवाभाव नसून केवळ व्यक्तिगत स्वार्थ किंवा केवळ स्वतःचे हित पाहण्याचा असल्यास त्यास हमखास अपयशच येते.

**खालील दोन उदाहरणांमधून हे स्पष्टपणे समजता येईल.**

**पहिले उदाहरण :** प्रभू श्रीराम आणि रावणाच्या युद्धात रावण व त्याचे सर्व साथीदार फक्त त्यांच्या शस्त्र- अस्त्र व वरदानांच्या मुळे त्यांच्यात विकसित झालेल्या अहंकाराच्या शक्तीवर अवलंबून होते. त्यांच्यात त्यांची कर्मे करताना इष्ट देवतेप्रती कोणताही सेवाभाव नव्हता. युद्ध करण्यामागील त्याचा उद्देश पण व्यक्तिगत स्वार्थ, व्यक्तिगत सुख असाच होता. त्यात कुठेही कर्तव्य भावना नव्हती. त्यामुळे रावणाला त्याच्या इष्ट देवतेचे म्हणजेच भगवान महादेवांचे साह्य मिळाले नाही. त्यामुळे रावणाला त्याच्या अहंकाराच्या शक्तीचा काहीही उपयोग झाला नाही व त्यांचा समूळ नाश झाला. या उलट प्रभू श्रीराम व माता सीता आपल्या स्वधर्माप्रमाणे आपली कर्तव्य कर्मे पूर्ण सेवाभावनेने त्यांचे इष्ट देव म्हणजे भगवान श्री महादेव व माता दुर्गा यांना स्मरून करत होते. तसेच लक्ष्मण, श्री हनुमान, सुग्रीव, जांबुवंत, अंगद, नल, नील व इतर सर्व त्यांची कर्तव्य कर्मे त्यांचे इष्ट दैवत प्रभू श्रीराम यांची सेवा म्हणून करत होते. आपल्या इष्ट देवतेच्या शक्तीचे अशा प्रकारे संवर्धन केल्यामुळे प्रभू श्रीराम व माता सीता तसेच त्यांच्या सर्व साथीदारांना युद्धात पूर्ण विजय मिळाला. रावण व त्याचे साथीदार श्रीरामांच्या बाजूकडील एकाही योद्ध्याला मारू शकले नाहीत.

**दुसरे उदाहरण :** महाभारतातील कौरव व पांडवाच्या भीषण युद्धाचा अभ्यास केल्यास पण स्पष्ट होते की, अहंकाराच्या शक्तीच्या संदर्भात विचार केल्यास कौरवांची बाजू पांडवांच्या बाजूपेक्षा भरपूर वरचढ व बलवान होती. कौरव व

त्यांचे साथीदार फक्त त्यांच्या अहंकाराच्या शक्तीवर अवलंबून होते. युद्धाचे कर्म करताना त्यांच्यातील एकातही इष्ट देवतेप्रती सेवाभाव नव्हता. युद्ध करण्यामागील त्यांचा उद्देश पण पूर्णपणे व्यक्तिगत स्वार्थ व पांडवांप्रती आकस होता. अगदी गुरू द्रोणाचार्य व पितामह भीष्म सुद्धा व्यक्तिगत कारणासाठीच युद्ध करत होते. त्या सर्वांत कुठेही स्वधर्मानुसार येणारी कर्तव्य भावना नव्हती. उलटपक्षी पांडव मात्र त्यांच्या स्वधर्मानुसार त्यांचे कर्तव्य कर्म म्हणून युद्ध करत होते. त्यामुळे पांडवांना त्यांच्या इष्ट देवतेची म्हणजे भगवान श्रीकृष्णांच्या शक्तीचे पूर्ण पाठबळ मिळाले व त्यांना युद्धात अशक्य असा विजय मिळाला.

वरील दोन्ही उदाहरणांमधून इष्ट देवतेच्या शक्तीचे अहंकाराच्या शक्तीवरील निर्विवाद वर्चस्व व श्रेष्ठता समजून येते. राजयोग साधकांना त्यांच्या इष्ट/ आराध्य/ उपास्य देवतेकडून ४ मुख्य स्वरूपात शक्ती व मार्गदर्शन मिळत असते. सनातन धर्माच्या धर्मग्रंथांनुसार कलियुगात व मुख्यतः आजच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स, गुगल, इंटरनेट च्या वैज्ञानिक युगात सांसारिक जीवनात इष्ट/ आराध्य/ उपास्य देवतेची शक्ती व मार्गदर्शन मिळत रहाण्यासाठी ऋषी-मुनींनी खालील उपासना पद्धती सांगितली आहे.

१) **श्री गणेश / श्री गणपतीची उपासना :** आपल्या इष्ट देवतेचे हे स्वरूप विद्यार्थीदशेत सांसारिक जीवनात उपयोगी असे लौकिक ज्ञान, विद्या मिळविण्यात साह्य करते.

२) **कुलदेवीची उपासना :** प्रत्येक व्यक्तीची कुलदेवी म्हणजे इष्ट देवतेच्या योगमाया शक्तीचे स्वरूप असते. सांसारिक जीवनात आवश्यक असे सुख व स्थैर्य कुलदेवीकडून मिळणाऱ्या शक्तीमुळेच येत असते.

३) **श्री हनुमानजीची उपासना :** इष्ट देवतेचे हे स्वरूप पारिवारिक, व्यावसायिक व सामाजिक जीवनात व्यावहारिक यश, विनम्रता, बळ व बुद्धी मिळविण्यासाठी साहाय्य करते .

४) **देवीची उपासना :** सांसारिक जीवनात सुख, यश, संपत्ती, समृद्धी व सर्वांगीण विकास मिळण्यात आपली इष्ट देवता श्री दुर्गामाता, श्री महालक्ष्मी, श्री अंबामाता, श्री आदिशक्ती या स्वरूपात मार्गदर्शन करत असते.

वरील चारही स्वरूपे आपल्या इष्ट देवतेचीच म्हणजे विश्वरूप परमात्म्याचीच स्वरूपे असल्यामुळे त्यांच्यासाठी सेवाभावनेने आपली कर्तव्य कर्मे करणे किंवा सरळ आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून आपली कर्तव्य कर्मे करणे यात काहीही भेद नाही.

**इष्ट देवतेच्या योगमाया शक्तीने विज्ञानाच्या अहंकाररूपी बेभरवशाच्या शक्तीवर नियंत्रण मिळवण्याचा उपाय असा आहे की,** आजच्या वैज्ञानिक उपकरणांच्या दृश्य स्वरूपातील अहंकाराच्या शक्तीला इष्ट देवतेच्या शक्तीचे पाठबळ देण्यासाठी आपण वापरत असलेली सर्व वैज्ञानिक उपकरणे आपल्या इष्ट देवतेच्या सेवेसाठी सुद्धा उपयोगात आणावी. त्यामुळे आपल्या इष्ट देवतेकडून त्या वैज्ञानिक उपकरणांचा योग्य उपयोग करण्याचे संकेत मिळत राहातात व आपली प्रगती जास्त वेगाने सुरू होते. राजयोग साधनेचे सध्याचे रोल मॉडेल पंतप्रधान श्री मोदी साहेब नेमके हेच करत आहेत.

**उदाहरणार्थ :** श्री मोदीजी देशात डिजिटल टेक्नॉलॉजी, इंटरनेट, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग वगैरे वगैरे वर आधारित सर्व प्रकारच्या वैज्ञानिक उपकरणांचा देशासाठी भरपूर वापर करत आहेत. त्यामुळेच सध्याचे GST इम्प्लिमेंटेशन, डिजिटल बेनिफिट ट्रान्सफर, ऑनलाईन पेमेंट्स वगैरे वगैरे शक्य झाले आहे. देशाचे उत्पन्न सतत वाढत आहे व आता भारत देश जगातील पाचवी अर्थव्यवस्था झालेली आहे. भारताचा विकास व प्रगती वेगाने चालू आहे. **दुहेरी स्वभावाच्या अहंकाररूपी विज्ञानाचा हा एक फायदेशीर उपयोग आहे.**

देशात कोरोनाच्या महामारीच्या अतिशय कठीण काळात भारताचे पंतप्रधान माननीय श्री मोदीजींनी देशातील वैज्ञानिकांच्या अहंकाररूपी शक्तीला त्यांच्या इष्ट देवतेच्या शक्तीची जोड देण्यासाठी सर्व वैज्ञानिकांना प्रोत्साहित केले व स्वतःच्या इष्ट देवतेच्या शक्तीची त्यांच्या वैज्ञानिक शक्तीला जोड देऊन कोरोनाच्या महामारीवर व्हॅक्सिन बनवून विजय मिळविला. त्यापुढे जाऊन त्या व्हॅक्सिनचा जगाला फुकट पुरवठा करून जगाला सुद्धा जागतिक महामारीपासून वाचविले. या बाबतीत कोणताही व्यापारी दृष्टिकोन न ठेवता केवळ ईश्वराची सेवा या मानसिकतेतून त्यांनी आपले काम केले.

श्री मोदीजींच्या अशा दृष्टिकोनातून कर्म करण्याची भावना व वृत्तीच आज भारताला मिळत असलेल्या अवकाश तंत्रज्ञान, संरक्षण तंत्रज्ञान वगैरे वगैरे अशा सर्व वैज्ञानिक यश व सुदृढ आर्थिक उन्नतीचे रहस्य आहे. हे दुहेरी स्वभावाच्या अहंकाररूपी विज्ञानाचा सांसारिक जीवतात फायदेशीर उपयोग करून घेण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

(संदर्भ पृष्ठ ४९, ५० तसेच १०२ ते १०४ पाहावे)

**सूचना :** ही गोष्ट कधीही ध्यानात ठेवणे आहे की, विज्ञानाची शक्ती म्हणजे या विश्वाच्या अहंकाराची शक्ती व प्रत्येक व्यक्तीच्या अहंकाराची शक्ती या दोन्ही शक्तीची उत्पत्ती दोन विपरीत गुणांच्या सह-अस्तित्वाने होत असते. त्यामुळे त्यांच्यापासून केवळ सुख, समाधान, स्थैर्य मिळण्याची अपेक्षा ठेवणे पूर्णपणे चुकीचे आहे. तसेच या जगात इष्ट देवतेच्या शक्तीच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या शक्तीकडे स्वतःचा असा काहीही उद्देश नसतो. जगातील इतर सर्व प्रकारच्या शक्ती ती शक्ती वापरणाऱ्याच्या उद्देशाप्रमाणे फळ देते. त्यामुळे आपल्या इष्ट देवतेप्रती सेवाभावनेने अहंकाराची व विज्ञानाच्या शक्तीचा वापर झाल्यासच आपल्या इष्ट देवतेच्या शक्तीच्या सहयोगामुळे हमखास यश, सुख, सर्वांगीण विकास, संपत्ती मिळणे शक्य आहे.

हे स्पष्ट करते की, भक्तियुक्त कर्मयोग साधकांना अहंकाररूपी शक्तीची म्हणजेच मायाशक्तीची मुळीच भीती वाटत नाही. त्यांच्या साठी ती सुद्धा फायदेशीरच ठरते. कारण त्यांना अहंकाररूपी शक्तीला आपल्या इष्ट देवतेच्या शक्तीचे पाठबळ देण्याचे ज्ञान राजयोग सूत्राची साधना शिकविते. अर्जुन व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनदर्शन व चरित्र अवलोकन केल्यास पण ही गोष्ट स्पष्ट होते.

**३७)** आपण रोजच्या जीवनात भक्तियुक्त कर्मयोग साधनेचा सराव करण्यासाठी आवश्यक अशी सर्व माहिती घेतली. आता आपण आपल्या स्वधर्माप्रमाणे आपले कर्तव्य कर्म आपल्या इष्ट देवतेची सेवा म्हणून करणे या, राजयोग सूत्रातील शिकवणुकीचा व सनातन धर्माचा संबंध जाणून घेऊ.

**३८)** महत्त्वाचे म्हणजे भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे हे सूत्र सनातन धर्माची मूळ शिकवण पण आहे. त्यामुळे आमच्या पूर्वजन्मात आमच्या सर्वांवर या साधनेचे

संस्कार झालेले आहेत. ईश्वराने स्वतः प्रभू श्रीराम व माता सीता या मानवी रूपात पृथ्वीवर जन्म घेऊन ही योगपद्धती त्यांच्या सांसारिक आयुष्यात जगून दाखविली आहे व जनमानसात रुजविली देखील आहे.

या चित्रात प्रभू श्रीरामांच्या सांसारिक जीवनातील महत्त्वाचे प्रसंग चित्रित केलेले आहेत. त्या सर्व प्रसंगात प्रभू श्रीरामांचा व त्यांच्या बरोबर असलेल्या माता सीता, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, श्री हनुमान या सर्वांचाच स्वधर्माप्रमाणे कर्तव्य कर्म सेवाभावनेने करण्यावर असलेला भर स्पष्ट होतो. दैनंदिन जीवनात या भक्तियुक्त कर्मयोग साधनेच्या सरावामुळे प्रभू श्रीरामांच्या राज्यात प्रजेतील सर्व स्तरांवर काम करणाऱ्या लोकांना त्यांच्या त्यांच्या आवश्यकतेनुसार वैयक्तिक, पारिवारिक, व्यावसायिक व सामाजिक जीवनात खात्रीपूर्वक यश, सुख, संपत्ती, समाधान मिळत होते व मिळाले होते. तीच रामराज्यची संकल्पना म्हणून आम्ही जाणतो.



(संदर्भ पृष्ठ ३९ पाहावे)

माता सीतेच्या निर्वाणानंतर ३६ वर्षांपर्यंत प्रभू श्रीरामांनी तसेच कौरव-पांडवांच्या महाभारताच्या युद्धानंतर ३६ वर्षांपर्यंत भगवान श्रीकृष्णांनी पण या भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे संस्कार सामान्य प्रजेत सर्वांच्या सुखासाठी संस्कारित केलेले आहेत. ३६ वर्षांचा कालखंड म्हणजे प्रभू श्रीरामांनी, तसेच भगवान श्रीकृष्णांनी सुद्धा जवळपास मानवाच्या ५ पिढ्यांवर या भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे संस्कार केलेले आहेत. **त्यामुळे ही साधना कोणत्याही व्यक्तीस नवी नाही.** त्यात शिकण्यासारखे नवीन असे काहीच नाही व अवघड पण नाही.

**प्रत्येक व्यक्तीत ती इनबिल्ट आहे** व जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक व्यक्ती कळत-नकळत आपल्या नैसर्गिक संस्कारांमुळे हे सूत्र जगतच असते. फरक इतकाच आहे की, हे सूत्र तुटक तुटकपणे जगले जाते. त्यामुळे आवश्यक आहे ते म्हणजे ईश्वराने आमच्या शरीरात या भक्तियुक्त कर्मयोग साधनेच्या स्वरूपात लोड

केलेल्या या सूत्राप्रमाणे आपली कर्तव्य कर्मे आपल्या इष्ट देवतेसाठी करणे चालू करणे.

एकदा राजयोग साधना सुरू केली की, गीतेतील सर्व योग साधना रोजच्या जीवनात त्यांच्या त्यांच्या व्यावहारिक उपयोगांसाठी उपलब्ध होतात. आपल्या शरीरातील कुंडलिनी शक्तीतील चित्रात दर्शविलेल्या साती चक्रांची जागृती चालू होते व त्याची अनुभूती पण येते. जागृत झालेल्या चक्रांच्या प्रभावामुळे सांसारिक जीवनातील कोणत्याही वयात आपापल्या स्थितीप्रमाणे व आवश्यकतेनुसार वैयक्तिक, पारिवारिक, व्यावसायिक जीवनात खात्रीपूर्वक यश, सुख, संपत्ती मिळणे सुरू होते. याची विस्तृत चर्चा या पुस्तकात पुढे केलेली आहे.



(संदर्भ पृष्ठ १५० ते १६३ पाहावे)

**३९)** वरील प्रकारे भक्तियुक्त कर्मयोग साधना केल्यास आपली इष्ट देवता आपले संचित कर्म व प्रारब्ध कर्म अशा प्रकारे नियंत्रित करते की, जीवनात आपला उत्कर्ष चालू राहतो, त्यामुळे सुख व सुखांची अनुभूती मिळते. पुस्तकात मोबाईल सेट व आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या कार्यपद्धतीचे उदाहरण घेऊन हे समजाविले आहे.

**४०) आता या राजयोग साधनेच्या संबंधातील काही आवश्यक अशा महत्त्वाच्या आणि गूढ गोष्टी समजून घेऊ.** अर्जुन व त्याचे प्रश्न, म्हणजेच दोन परस्पर विरोधी विचार व भावनांचे द्वंद्व! लक्षात घेणे की, मानवी जीवनात आमची सर्वांची स्थिती अर्जुनासारखीच वेळोवेळी द्विधा होत असते. परंतु आमचा आमच्या इष्ट देवतेशी संपर्क नसल्यामुळे आमचे निर्णय चुकतात. आजच्या वैज्ञानिक, डिजिटल व गतिमान युगात तर आपल्या इष्ट देवतेशी संपर्क ठेवणे अजून अवघड झाले आहे. त्यामुळेच विज्ञानाचा कितीही वापर केला तरी निर्णय चुकतात व असुरक्षित भावना राहते. आपल्यात नम्रता असल्यास आपली इष्ट देवता

आपल्यास कशी मदत करते याची जाणीव म्हणजेच भगवद्‌गीतेची अनुभूती! अर्जुनाची इष्ट देवता भगवान श्रीकृष्ण आहे.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत अध्याय २, श्लोक ७ येथे अर्जुनाची नम्रता व त्याचा श्रीकृष्णाशी असलेला समर्पण भाव प्रदर्शित होतो. श्लोक असा आहे :-

कार्पण्यदोषो पहत स्वभावः ।<br>
पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः।।<br>
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे ।<br>
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।।

**या श्लोकाचा भावार्थ :-** भगवान श्रीकृष्णांना पूर्ण समर्पित भावाने अर्जुन सांगतो की, माझ्या मन व बुद्धीतील विपरीत भावनांच्या मानसिक द्वंद्वांमुळे मी निर्णय घेण्याच्या बाबतीत पूर्णपणे गोंधळात पडलो आहे. अशा परिस्थितीत कृपया आपण माझे मार्गदर्शन करा. मी आपला शिष्य आहे व आपल्याला समर्पित आहे. हा श्लोक हे स्पष्ट करतो की, आपली नम्रता व आपल्या इष्ट देवतेशी आपला संबंध कसा असावा.

**४१)** या भक्तियुक्त कर्मयोगाची साधना समजण्यासाठी अर्जुनास आपला आदर्श (रोल मॉडेल) करावा व अर्जुनाने आपल्या अहंकाराचा उपयोग जसा त्याच्या स्वधर्मानुसार त्याचे कर्तव्य कर्म, त्याची इष्ट देवता म्हणजेच भगवान श्रीकृष्णांची सेवा करणे अशी मानसिकता ठेवून युद्ध केले तशी मानसिकता विकसित करणे. आध्यात्मिक भाषेत **यालाच पुरुषार्थ असे म्हणतात**. तसे केल्यास व्यक्तीला आपल्या इष्ट देवतेचे रोजच्या जीवनात साहाय्य मिळते व सर्व भौतिक सुखांची प्राप्ती आपोआप होते. यश मिळते.

**४२) श्री हनुमान यांची भक्ती केल्यामुळे प्रभू श्रीरामांची अनुभूती येते.** त्यामुळे स्वधर्माचे महत्त्व व स्वधर्मानुसार स्वतःसाठी येणाऱ्या विविध कर्तव्य कर्मांची समज येते. तसेच आपली दैनंदिन कर्मे सिद्ध होण्यात व त्या कर्मांद्वारे आपल्यास, आपल्या कुटुंबास जीवनात यश मिळण्यात असलेले इष्ट देवतेचे साहाय्य पण उमजते. अशा प्रकारे राजयोग सूत्रातील सर्व गोष्टींचा उलगडा होतो.

**भगवान प्रभू श्रीराम व देवी सीतामाता यांचे जीवन चरित्र व भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे महत्त्व :** लक्षात घेणे की, ईश्वराने या सांसारिक

जीवनात प्रभू श्रीराम व देवी सीतामाता यांच्या स्वरूपात जन्म घेऊन मानव जातीला या भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे संस्कार दिलेले आहेत. त्या दोघांनी हा भक्तियुक्त कर्मयोग त्यांच्या जीवनाचे सूत्र बनवून सिद्ध केला आहे व त्यात दोन्ही वरदान गुप्तपणे स्थिर केले आहेत. प्रभू श्रीराम व देवी सीता यांच्या श्रीरामायण कथेचे श्रवण, मनन, अभ्यास व चिंतन केल्यास भक्तियुक्त कर्मयोग साधना सांसारिक जीवनात कशी विकसित करायची हे समजते. तसेच या साधनेस ईश्वराने दिलेल्या दोन वरदानांची खात्री पण पटते व जीवनात सर्वांगीण प्रगती करण्याचा मार्ग स्पष्टपणे उमजतो.

**४३)** श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवंताने प्रथम कर्मयोग सांगितला; परंतु आजच्या २१ व्या शतकातील डिजिटल, मोबाईल, व्हॉट्सअॅप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) प्रणालीच्या काळात कर्मयोग साधना शक्य नाही. आजच्या काळात कर्मफळ इष्ट देवतेस (ईश्वरास) समर्पित करण्याची भावना विकसित होत नाही व त्यामुळे रोजच्या धावपळीच्या जीवनात कर्मयोग साधता येत नाही. आजच्या काळातील द्विधा मनःस्थिती व सततच्या आकर्षणामुळे कर्म करण्यासंबंधातील निर्णय घेणे सोपे नाही. लक्षात घेणे की, **गुंतागुंतीच्या किंवा क्लिष्ट परिस्थितीत कर्मयोग साधना फलदायी होत नाही.** म्हणूनच फक्त कर्मयोग उपयोगाचा नाही. अर्जुनाच्या स्थितीत सुद्धा ते सोपे नव्हते. केवळ कर्मयोग साधना अवघड आहे म्हणूनच भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्णांनी कर्मयोग सांगून तो सिद्ध करण्यासाठी पुढे बुद्धियोग, सांख्ययोग, ज्ञानयोग, संन्यासयोग, कर्मसंन्यास योग, ज्ञानकर्म संन्यासयोग, ध्यानयोग, विभूतीयोग अशी राजयोग साधनेची इतर अंगे सुद्धा स्पष्ट केली आहेत. आणि हे सर्व योग सांगून कर्मयोग सिद्ध करण्यासाठी भक्तीची आवश्यकता सांगितली आहे.

**४४)** श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवंताने इतर सर्व प्रकारच्या योग साधना समजण्यासाठी भक्तियोग सांगितला आहे व त्याची आवश्यकता पण स्पष्ट केली आहे. परंतु सध्याच्या काळात कर्म करून सांपत्तिक उत्कर्ष केल्याशिवाय जीवन जगणे शक्य नाही. चरितार्थासाठी सांसारिक कर्म करावेच लागते. **त्यामुळे या वैज्ञानिक युगात केवळ भक्तियोग साधना सांसारिक आयुष्यात यश देत नाही.**

**४५)** श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील अंतर्निहित ज्ञानाच्या अनुभूतींवर सादर केलेल्या या राजयोग पुस्तकात सर्व योग साधनेच्या मार्गदर्शनाबरोबर कुंडलिनी योग, संचित कर्म, प्रारब्ध कर्म व आपण करत असलेले क्रियमाण कर्म यांचा सरळ संबंध दर्शविला आहे.

**४६)** शेवटी भगवान श्रीकृष्णांनी अध्याय १८, श्लोक ६६ : ।।

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणम् व्रज ।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।

या श्लोकाद्वारे मोक्ष संन्यासयोग सांगितला. अर्जुनाला सर्व समजले का? असे विचारले व निर्णय करण्याचे स्वातंत्र्य दिले. (कोणता धर्म अभिप्रेत आहे? स्वधर्म अभिप्रेत आहे, शरणम् म्हणजे ईश्वराप्रती समर्पित भाव)

**या श्लोकाचा भावार्थ असा आहे :** सर्व प्रकारच्या तुझ्या मन, बुद्धी, (विचार व भावना), स्मृती यातून निर्माण होणाऱ्या परस्परविरोधी व विरोधाभासी भावनांकडे दुर्लक्ष कर आणि तुझ्या स्वधर्माप्रमाणे केवळ माझ्यासाठी (म्हणजे तुझ्या इष्ट देवतेसाठी) समर्पण भावाने तुझी कर्तव्य कर्मे पार पाडण्यासाठी तुझ्या अहंकाराचा उपयोग कर. तुझ्या कर्तव्यनिष्ठ कृतींमुळे निर्माण होणाऱ्या गोंधळांतून मी तुला मुक्त करीन. ''या क्षणीच अर्जुनाच्या हृदयात ज्ञान जागृत झाले व त्याला जाणीव झाली की, त्याने श्रीकृष्णाप्रती म्हणजेच त्याच्या इष्ट देवतेप्रती समर्पित होऊन कर्म केले पाहिजे. या द्वंद्वमय जगात कर्म करण्यासाठी हेच खरे आणि योग्य धोरण आहे''.

**४७)** यावेळी अर्जुनाला भक्तियुक्त कर्मयोगाची गुरुकिल्ली सापडली व अर्जुनाने आपली समज पुढील प्रकारे प्रकट केली. अर्जुन आनंदित झाला व भगवान श्रीकृष्णांना म्हणाला : अध्याय १८, श्लोक ७३ :

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा
त्वत्प्रसादान्मयाच्युत ।।
स्थितोऽस्मि गतसन्देहः
करिष्ये वचनं तव ।।

**भावार्थ :** अर्जुन म्हणाला : हे श्रीकृष्णा आपल्या कृपेने माझा मोह नाहीसा झालेला आहे, माझ्या मनातील विपरीत भावनांचा माझ्यावरील प्रभाव नष्ट

झालेला आहे आणि आता मला माझी स्मृती प्राप्त झालेली आहे. मी संशयरहित होऊन स्थिर झालो आहे. हे श्रीकृष्णा, आता मी माझ्या स्वधर्माप्रमाणे माझे कर्तव्य कर्म असलेले हे युद्धकर्म आपली सेवा म्हणून करीन! (यापुढे नेहमी मी अशा भावनेतूनच माझी कर्मे आपली सेवा म्हणून करत राहीन).

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत येथेच **भक्तियुक्त कर्मयोग** प्रकट झाला आहे.

**४८)** या प्रकारे लक्षात घेणे की, भक्तियुक्त कर्मयोग ही अर्जुनाची अनुभूती आहे. त्यामुळेच त्याची सरळ व्याख्या भगवद्‌गीतेत सापडत नाही. तो योग *अनुभूतीजन्य/सहजज्ञान आहे. अर्जुनाने आपल्या स्वधर्माप्रमाणे आपल्या क्रियमाण कर्मातून आपले कर्तव्य कर्म, त्याची इष्ट देवता म्हणजेच भगवान श्रीकृष्णांची सेवा म्हणून युद्ध केले. त्या युद्धात त्याला खाली दाखविलेल्या **चक्र ६ व चक्र ७** म्हणजेच भक्तियुक्त कर्मयोग साधनेस असलेल्या दोन वरदानांची पूर्ण अनुभूती मिळाली. अर्थात भक्तियुक्त कर्मयोग साधना पूर्णपणे समजली व जीवनात त्याला यश, कीर्ती, सुख, समृद्धी व सर्वांगीण प्रगती प्राप्त करण्याची गुरुकिल्ली मिळाली. त्यानुसार पांडवांनी त्यांचे उर्वरित आयुष्य लोककल्याण व धर्माची (म्हणजेच स्वधर्म आचरण्याची) स्थापना करण्यात घालवले. हे भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे महत्त्व स्पष्ट करते.

(* अनुभूतीजन्य/सहजज्ञानाचा अर्थ : हा योग अनुभव, अंतरबोध, अंतर्ज्ञान, जाणीव , संवेदना या स्तरावर समजून घेण्याची प्रक्रिया आहे. हा असा अनुभव सहजपणे मिळतो, ज्याचा आरंभ आणि शेवट दिसत नाही.)

**४९)** लक्षात घेणे की, आपण आपल्या अहंकाराचा उपयोग अर्जुनाप्रमाणे

**चक्र क्रमांक ६ आज्ञा चक्र, योगमाया शक्ती**

या चक्राची जागरूकता आपल्या इष्ट (आराध्य) देवतेची आपल्याला जाणीव देते.
**हे चक्र काय दर्शविते?** न मे भक्तः प्रणश्यति ! याचा अर्थ :
आपल्या इष्ट (आराध्य) देवतेबद्दलची आपली खात्री की, इष्ट देवता भक्तियुक्त कर्मयोग साधकाला अडचणीच्या वेळी साथ देते.
**हे चक्र सक्रिय करण्यासाठी काय करावे?** आपल्या इष्ट (आराध्य) देवतेप्रती श्रद्धा आणि विश्वासाने राजयोगसूत्राचे अनुसरण करणे.
चक्र १, २ व ३ च्या संयोगाने सांसारिक कर्तव्य कर्मे पार पाडण्यासाठी स्व-प्रयत्न (पुरुषार्थ) करणे.

(विस्तारित माहितीसाठी तक्ता क्र. ७ व ८ पृष्ठ क्र. ६४ व ६५ वाचवे)

**चक्र क्रमांक ७ सहस्रार चक्र, योगमाया शक्ती**

या चक्राची जागरूकता आपल्या इष्ट (आराध्य) देवतेची
आपल्याला जाणीव करून देते, पुष्टी करते.

**हे चक्र काय दर्शविते? योगक्षेमं वहाम्यहम्! याचा अर्थ :**
आपल्या इष्ट (आराध्य) देवतेच्या अस्तित्वाचा अनुभव. आपले इष्ट (आराध्य) दैवत, परमात्मा भक्तियुक्त कर्मयोग साधकांवर त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विशेष लक्ष ठेवतात आणि त्यांची काळजी घेतात याची जाणीव.

**हे चक्र सक्रिय करण्यासाठी काय करावे?** आपल्या इष्ट (आराध्य) देवतेप्रती श्रद्धा आणि विश्वासाने राजयोग सूत्राचे अनुसरण करणे.
चक्र १, २ व ३ च्या संयोगाने सांसारिक कर्तव्य कर्मे पार पाडण्यासाठी स्व-प्रयत्न (पुरुषार्थ) करणे .

**हे चक्र सक्रिय झाल्याची अनुभूती काय आहे?** आपल्या इष्ट (आराध्य) देवतेवर श्रद्धा व विश्वास दृढ होणे. आपल्या इष्ट (आराध्य) देवतेच्या कृपेने सांसारिक जीवनात तणावरहित यश, सुख, आनंद, संपत्ती मिळत राहणे.

(विस्तारित माहितीसाठी तक्ता क्र. ७ व ८ पृष्ठ क्र. ६४ व ६५ वाचवे)

कर्तव्य कर्म, स्वधर्म व इष्ट देवतेची सेवा यांचा समन्वय साधण्यासाठी केल्यास पुस्तकात स्पष्ट केल्याप्रमाणे चक्र ६ व चक्र ७ च्या जागृतीचे अनुभव येऊ लागतात. म्हणजेच आपल्या इष्ट देवतेच्या या भक्तियुक्त कर्मयोग साधनेस असलेल्या दोन वरदानांचे आपल्यास रोजच्या जीवनात साहाय्य मिळू लागते.

**५०)** या भक्तियुक्त कर्मयोग सूत्राला आचरणात आणून आपण दैनंदिन जीवनात करत असलेल्या असंख्य कर्मांच्या परिणामी आपले नशीब आपल्याला कसे मदत करू लागते हे आता समजून घेऊ.

राजयोग सूत्राची साधना करत असताना कुंडलिनी जागृत करण्याच्या योग साधनेतील प्रथम ३ चक्रांची जागृती आपोआपच होत असते. या राजयोग साधनेची किमया अशी आहे की, ही साधना आंगिकारणाऱ्या लोकांना त्यांच्या इष्ट देवतेचे प्रेम मिळणे चालू होते व त्यांची इष्ट देवता अशा साधकाच्या कुंडलिनी शक्ती केंद्रातील चक्र ६ आणि चक्र ७ ची जागृती करून देते. या सर्वांची साधकाला जाणीव व अनुभूती पण मिळते. अशाप्रकारे राजयोग सूत्राच्या

साधनेतून साधकाच्या ५ चक्रांची जागृती आपोआप होत असते. या प्रकारे विनासायास ५ चक्रांची जागृती झाल्यामुळे उर्वरित चक्र ४ व चक्र ५ सहजच जागृत होतात.

**५१)** या पुस्तकात मोबाईल सेटचे उदाहरण घेऊन केवळ आपल्या कर्तव्य कर्मांच्या साहाय्याने म्हणजे केवळ एका चक्राच्या (चक्र१) वापराने वैयक्तिक, पारिवारिक व व्यावसायिक आयुष्यात उन्नती होणे कसे सुरू होते हे स्पष्ट केले आहे. मोबाईल फोनच्या वापराच्या उदाहरणातून हे सहजच स्पष्ट होते की, भक्तियुक्त कर्मयोग साधना केल्यास आपली इष्ट देवता आपले संचित कर्म व प्रारब्ध कर्म अशाप्रकारे नियंत्रित करते की, त्यामुळे सांसारिक जीवनात आपला उत्कर्ष चालू राहतो.

**५२)** ईश्वराने मानवाची निर्मिती करताना प्रथम ५ वेगवेगळ्या शरीरांची निर्मिती केली. त्या ५ शरीरांना पंचकोष असे म्हणतात. त्यानंतर ईश्वराने त्या ५ कोषांच्या संयोगातून मानवाच्या स्थूल शरीराची निर्मिती केलेली आहे. आमच्या ऋषी-मुनींनी त्या पंचकोषांना **अन्नमय कोष, मनोमय कोष, बुद्धिमय कोष, प्राणमय कोष व आनंदमय कोष** अशी नावे दिलेली आहेत. मानवाच्या कुंडलिनी शक्तीतील ५ चक्रे त्या पंचकोषांचे जन्मापासून मृत्यूपर्यंत नियंत्रण करत असतात. आजच्या वैज्ञानिक युगातील मानवाने प्रथम ३ कोषांच्या मदतीने आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या कार्यपद्धतीवर स्मार्ट मोबाईल फोन, रोबोट, स्वयंचलित उपकरणे निर्माण केलेली आहेत.

**(पुढील पानावरील चित्रात हे स्पष्ट केले आहे).**

**५३)** ज्या पद्धतीप्रमाणे स्मार्ट मोबाईल सेटमधील कृत्रिम बद्धिमत्तेची कार्यपद्धती मोबाईल फोनमधील, १) टच स्क्रीन, २) सेंट्रल प्रोसेसिंग युनिट, डेटा स्टोरेज, RAM ROM मेमोरी, ३) स्मार्टफोनमधील नेहमी वापरात असलेले ॲप्स यांच्यावर अवलंबून असते, त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची **प्रारब्ध कर्मफळे** आणि **संचित कर्मफळे** व्यक्तीच्या **कर्तव्य कर्मे** करण्याच्या पद्धतीवर अवलंबून असतात.

आजच्या वैज्ञानिक युगातील स्मार्ट फोन, गुगल मॅप, वेगवेगळ्या प्रकारचे ॲप्स वगैरे अशा सर्व गोष्टी आर्टिफिशियल इंटेलिजन्सची कार्यपद्धती वापरून

# भक्तियुक्त कर्मयोग सरावामध्ये स्मार्टफोन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) प्रणालीच्या आकलनाद्वारे मानवी जीवनातील पंचकोष (५ चक्रे) यांची एकत्रित समज.

**चक्र. २**

विज्ञानमय कोष (बुद्धी), स्वाधिष्ठान चक्र

आजच्या स्मार्टफोनचे सेंट्रल प्रोसेसिंग यूनिट, Android, iOS जसे मोबाईल ऑपरेटिंग सिस्टम, डेटा स्टोरेज RAM, ROM मेमोरी, सर्व ॲप्स ज्यांची संख्या ३० ते ४० लाखांहून अधिक आहे. ते सर्व आपल्या चक्र क्रमांक २ बरोबर (बुद्धी) संबंधित आहे.

**चक्र. ३**

मनोमय कोष (मन, विवेक) मणिपूर चक्र

स्मार्टफोनचा अँटेना, मोडम्स, कॅमेरा, सर्व सेन्सर्स आपल्या नेहमीच उपयोगात असतात असे सर्व ॲप्स आपल्या चक्र ३ बरोबर (मन, स्मृती) साम्य दर्शविते




**चक्र. १**

अन्नमय कोष (शरीर), मूलाधार चक्र

आजचे स्मार्टफोन, त्याची टच स्क्रीन, आवश्यक बटणे आणि बॅटरी यांच्यासह आपले चक्र १ बरोबर (शरीर आणि इंद्रियांचा समूह) साम्य दर्शविते

**चक्र. ४**

प्राणमय कोष (श्वास, आत्मा), अनाहत चक्र (अनुभूती चक्र)

स्मार्टफोनमध्ये चक्र ४ नाही. स्मार्टफोनची डिजिटल एनर्जी (ऊर्जा), चक्र क्रमांक ४ बरोबर (श्वास, आत्मा) मिळते; परंतु, स्मार्टफोनमध्ये आत्मा नसतो, तो निर्जीव आहे.

आनंदमय कोष (आनंद, सुख), विशुद्धी चक्र (पूर्ण अनुभूती चक्र)

**चक्र. ५**

स्मार्टफोनमध्ये चक्र ५ नाही. स्मार्टफोनमध्ये वापरल्या जाणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) प्रणाली, विज्ञानाचे महत्त्व दर्शविते. परंतु ते पूर्णपणे मानवी बुद्धिमत्तेवर आणि मनावर अवलंबून आहे. प्रकृतीच्या नियमांनी बांधलेले आहे. स्वतंत्र दिसते, परंतु पूर्णतः माया किंवा प्रकृतीच्या अधीन असते. AI प्रणाली चक्र क्रमांक ५ बरोबर समानता दर्शविते; परंतु ते मायेचेच एक रूप आहे. ते पूर्णपणे आपल्या इष्ट (आराध्य) म्हणजेच परमात्म्याच्या अधीन आहे.

✻ आजच्या युगातील AI प्रणाली, क्लाउड कॉम्प्युटिंग तंत्रज्ञान, इंटरनेट इत्यादी सर्व सेवा भौतिक संसाधनांवर अवलंबून आहेत. सर्व भौतिक संसाधने शेवटी ईश्वराच्या नियंत्रणाखालीच कार्य करतात.

विज्ञानाने निर्माण केलेल्या आहेत. त्यांचे उदाहरण घेऊन राजयोग साधना कशा प्रकारे आमचे **प्रारब्ध कर्मांचे** व **संचित कर्मांचे** नियंत्रण करते व त्यामुळे आमच्या वर्तमान जीवनात यश, सुख व सर्वांगीण विकास कसा होतो हे स्पष्ट केले आहे.

**५४)** भक्तियुक्त कर्मयोग साधना केल्यास आपली इष्ट देवता आपले संचित कर्म व प्रारब्ध कर्म अशा प्रकारे नियंत्रित करते की, सांसारिक जीवनात आपला उत्कर्ष चालू राहतो. मोबाईल सेटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता कशी कार्य करते याचे उदाहरणासह वेळ-आधारित विश्लेषणावर चर्चा करणे.

लक्षात घ्या की, भगवद्‌गीतेतील **अध्याय १८, श्लोक ६१ व श्लोक ६२** सध्याच्या युगातील आर्टिफिशियल इंटेलिजन्सची कार्यपद्धती स्पष्ट करते. वेळेप्रमाणे खालील दोन श्लोक घेऊन सखोल विवेचन केले जाऊ शकते. आजच्या वैज्ञानिक युगातील स्मार्ट फोन, गुगल मॅप, वेगवेगळ्या प्रकारचे ॲप्स वगैरे अशा सर्व गोष्टी आर्टिफिशियल इंटेलिजन्सची कार्यपद्धती वापरून विज्ञानाने निर्माण केलेल्या आहेत.

भगवद्‌गीतेतील खालील दोन श्लोक आर्टिफिशियल इंटेलिजन्सची कार्यप्रणाली व त्या श्लोकांचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध दर्शवितात.

अध्याय १८: श्लोक ६१ व ६२ असे आहेत :-

ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।।
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।

**वरील दोन श्लोकांचा भावार्थ :-** भगवद्‌गीतेत या दोन श्लोकांमध्ये संपूर्ण विश्वाची वर वर स्वयंचलित दिसणारी कार्यपद्धती स्पष्ट झालेली आहे. ईश्वराने आपल्या विविध रूपांत हे ज्ञान प्रकट केले आहे की, या भौतिक विश्वातील सर्वच प्राणिमात्र आपापल्या शरीररूपी यंत्राद्वारे विविध कर्मे करीत असतात. लक्षात घेणे की, ईश्वर (परमेश्वर) सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात त्यांच्या इष्ट देवतेच्या स्वरूपात निवास करत असतात व प्रत्येक व्यक्तीचे त्याच्या कर्मांनुसार या विश्वातील विविध इष्ट देवतांच्या स्वरूपात आपल्या विविध शक्तींद्वारे नियंत्रण करत असतात.

लक्षात घेणे की, अशा प्रकारे ईश्वर स्वतःच्या विविध शक्तींद्वारे या भौतिक जगाचे नियंत्रण करतात. ईश्वराच्या अशा विविध शक्तींच्या समूहालाच ईश्वराची माया म्हणून संबोधिले जाते. त्यामुळे आपण आपल्या इष्ट देवतेप्रती समर्पित भावनेने कर्मे केल्यास आपली इष्ट देवता तिच्या मायाशक्तीची अशी योजना करते, की आपली कर्मे नियंत्रित होऊ लागतात, त्यांचा क्रम बदलू लागतो, वाईट कर्मफळाची तीव्रता कमी होऊ लागते. परमेश्वर (ईश्वर) आपल्या इष्ट देवतेच्या स्वरूपात आपली प्रारब्ध कर्मफळे आपल्याच संचित कर्मफळांचा उपयोग करून नियंत्रित करत आपला उत्कर्ष प्रशस्त करतात, हेच कारण आहे की, आपल्या इष्ट देवतेप्रती समर्पित भावनेने म्हणजेच सेवाभाव वृत्ती ठेवून आपण आपली दैनंदिन कर्मे केल्यास आपल्याला आपल्या इष्ट देवतेचे जास्त सहकार्य मिळू लागते व ते आपणास जाणवते.

**५५) शरीरातील आपल्या आत्म्याचे कार्य व ७ ऊर्जा चक्रे :** आपण घेत असलेला श्वास आपल्या शरीरात गेल्यावर आपला आत्मा त्या श्वासाला 'प्राणवायू, अपान वायू, व्यान वायू, उदान वायू व समान वायू' अशा ५ प्रकारच्या वायूंमध्ये रूपांतरित करतो. आपला आत्मा आपण ग्रहण करत असलेल्या अन्नातून कर्म करण्यासाठी आवश्यक अशी ऊर्जा शक्ती पण निर्माण करत असतो व वर उल्लेख केलेल्या ५ वायूंद्वारे ती ऊर्जाशक्ती शरीरातील ५ मुख्य ऊर्जा चक्रांना पुरवितो. लक्षात घ्यावे की, आपला आत्मा आपल्या शरीरातील ५ मुख्य ऊर्जा चक्रांद्वारे शरीरातील मन, बुद्धी, चित्त, अहंकार व पूर्ण शरीराचे सर्व इंद्रियांसकट नियंत्रण करतो.

महत्त्वाचे म्हणजे आपण करत असलेले कर्म, तसेच आपले प्रारब्ध कर्म, संचित कर्म या सर्वांचा या पाच प्रकारच्या वायूंशी सरळ संबंध आहे. उर्वरित दोन चक्रे म्हणजे चक्र ६ आणि चक्र ७ यांची ऊर्जा शक्ती सेवाभावनेतून कर्म केल्यामुळे निर्माण होते. **अशा प्रकारे पंच महाभूतांनी बनलेल्या आपल्या शरीराने आपण कर्म करत असतो.**

लक्षात घ्या की, सांसारिक जीवनात प्रगती होण्यामध्ये या सर्वांची महत्त्वाची भूमिका असते. राजयोग साधनेद्वारे अशा सर्व गोष्टीची अनुभूती प्राप्त होते व जीवनात सर्वांगीण उत्कर्ष व प्रगती साधता येते.

मागील अनेक जन्मात आपणच केलेल्या विविध प्रकारच्या कर्मांची साठलेली; पण फलान्वित न झालेली कर्मफळे यांस **संचित कर्म** असे म्हणतात व त्यातील या जन्मात वाट्यास आलेल्या किंवा फलान्वित झालेल्या कर्मफळांस **प्रारब्ध कर्म** असे म्हणतात. चालू जन्मात आपण करत असलेल्या कर्मांना **क्रियमाण कर्मे** असे म्हणतात. **(पंच महाभूते :** पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू आणि आकाश).

**५६)** भक्तियुक्त कर्मयोग साधना सर्व प्रकारच्या योग साधनांचे एकत्रीकरण करते व कुंडलिनी योग किंवा ध्यानयोग साधनेत चर्चा होत असलेल्या सर्व ७ चक्रांची जागृती कशी होते याची अनुभूती पण देते. **राजयोग साधनेच्या मूळ सूत्रात आपल्या शरीरातील पंचकोष व ७ ऊर्जा चक्रे जागृत करण्याचे सामर्थ्य आहे.**

**५७)** या पुस्तकात तक्त्यांच्या साहाय्याने भक्तियुक्त कर्मयोग साधना आपल्या शरीरातील ७ चक्रे व पंचकोष यांची जागृती कशी करते व त्यामुळे सांसारिक जीवनात आपण करत असलेल्या विविध क्रियमाण कर्मांद्वारे प्रगती कशी केली जाऊ शकते हे स्पष्ट केले आहे. तसेच या पुस्तकात श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील सर्व ७०० श्लोकांचे विविध तक्त्यांच्या साहाय्याने ७ चक्रे, पंचकोष यांच्या स्वरूपात संकलन केले आहे व त्या सर्वांचा सांसारिक जीवनात सुख, यश, कीर्ती, समृद्धी मिळविण्यासाठीचा स्पष्ट संबंध व दिशा दाखवली आहे.

**५८)** या पुस्तकात आपण आपल्या दैनंदिन जीवनात करत असलेली विविध कर्मे, भक्तीचे मूळ स्वरूप, कर्माची तत्त्वप्रणाली, कर्मकृतींचा सिद्धांत, आपला अहंकार, आपला श्वास व आपले कर्म यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच सांसारिक जीवनात पैशांच्या स्वरूपात दिसून येणारे चलन आणि कर्मरूपी चलन जे आपल्या विविध क्रियमाण कर्मांच्या रूपात आपण दैनंदिन जीवनात खर्च करत असतो; परंतु आपणास दिसत नाही यावरही चर्चा केलेली आहे.

राजयोग सूत्रातील रहस्य, इष्ट देवतेची अनुभूती व शरीरातील ७ चक्रांचा म्हणजेच आपल्यातील ७ ऊर्जा शक्तींचा संबंध व त्यांच्या जागृतीचा सोपा मार्ग दाखवला आहे.

**५९)** या पुस्तकात श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील सर्वश्रुत व प्रसिद्ध अशा दुसऱ्या अध्यायातील ४७ व्या श्लोकाचा गूढ अर्थ व कर्माची तत्त्वप्रणाली श्रीमद्‌भगवद्‌गीतेतीलच १८ व्या अध्यायातील श्लोक : १४ व श्लोक ४८ याचा संदर्भ देत समजण्यास सोपा केला आहे. त्याचा भक्तियुक्त कर्मयोग सूत्र सिद्ध होण्याच्या साधनेत सरळ संबंध आहे. वेळेप्रमाणे पुढील दोन श्लोक घेऊन सखोल विवेचन केले जाऊ शकते.

अध्याय २: श्लोक ४७ :-

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोस्त्वकर्मणि ।। ४७ ।।

**या श्लोकाचा गूढ भावार्थ :** लक्षात ठेवणे की, आपल्याला आपले कर्तव्य कर्म करण्याची मुभा किंवा अधिकार आहे. परंतु येणाऱ्या कर्म फळांवर आपला पूर्ण अधिकार नसतो. कारण आपण करत असलेल्या आपल्या कर्मांच्या फळांचे श्रेय केवळ आपले एकट्याचे नसते. आपल्या कर्म फळांवर इतरांच्या कर्मांचा सुद्धा चांगला किंवा वाईट प्रभाव (भाग) असतो.

आपल्या कर्तव्य कर्माच्या फळांवर आपला पूर्ण अधिकार नाही हे माहीत असले तरी आपले कर्तव्य कर्म न करणे किंवा कर्मच न करणे हे सुद्धा बरोबर नाही. कारण कर्मच न करणे (प्रयत्नच न करणे) हे सुद्धा एक चुकीचेच कर्म आहे. त्यामुळे कर्तव्य कर्म किंवा कर्म न करण्याची प्रवृत्ती पण चुकीचीच ठरते.

भगवद्‌गीतेतील खालील दोन श्लोक वरील श्लोकाचा आशय/अर्थ स्पष्ट करतात.

अध्याय १८: श्लोक १४:-

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टादैवं चैवात्र पञ्चमम् ।।

हा श्लोक अध्याय २, श्लोक ४७ चा गूढ अर्थ स्पष्ट करतो.

**भावार्थ :** लक्षात घेणे की, कोणत्याही कर्माद्वारे येणाऱ्या फळांत १) आपले शरीर, २) आपला अहंकार (आत्मा, कर्ता भाव), ३) आपली विविध इंद्रिये त्यांच्या धारणांसह ४) आपल्या इंद्रियांद्वारे करण्यात येणाऱ्या विविध क्रिया व ५) आपले दैव किंवा आपले भाग्य असे पाच अविभाज्य घटक असतात. दैव, भाग्य यालाच आपण ईश्वरी कृपा असे सुद्धा समजतो.

लक्षात घेणे की, यापैकी कोणत्याही व्यक्तीचे या पाचव्या घटकावर म्हणजेच आपल्या दैवावर किंवा आपल्या भाग्यावर काहीच नियंत्रण नसते. हे स्पष्ट करते की, आपण करत असलेल्या कर्मांच्या फळांवर आपले पूर्ण नियंत्रण असू शकत नाही. आता या दुसऱ्या श्लोकाचा आशय पाहू.

अध्याय १८: श्लोक ४८:-

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृता:।।

हा श्लोक सुद्धा अध्याय २, श्लोक ४७ चा गूढ अर्थ स्पष्ट करतो.

**भावार्थ :** जसा अग्नीबरोबर थोडा तरी धूर असतोच, त्याचप्रमाणे प्रत्येक कर्मात काहीतरी दोष लपलेलाच असतो. त्यामुळेच आपल्या कर्तव्य कर्मात आपल्याला जरी थोडा दोष वाटला तरी कर्तव्य कर्माचा त्याग करणे चुकीचे ठरते. त्यामुळेच सांसारिक जीवनात कर्तव्य कर्म टाळण्याची वृत्ती चुकीची ठरते. तसेच कर्तव्य कर्म करण्याच्या संबंधात निर्णयच न घेण्याची वृत्ती पण चुकीची ठरते.

**६०)** या प्रमाणे या पुस्तकात श्रीमद् भगवद्गीतेतील सार व त्याचा सांसारिक जीवनात यश मिळवण्याशी असलेला सरळ संबंध राजयोग सूत्राची साधना करत असताना स्पष्ट होतो व तेच राजयोग सूत्राचे सामर्थ्य आहे. यातच भक्तियुक्त कर्मयोगाची पूर्तता आहे. प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, भरत व श्री हनुमान या सर्वांनी तसेच भगवान श्रीकृष्ण, बलराम व अर्जुन यांनी देखील मानव जातीला स्वधर्मानुसार येणाऱ्या कर्तव्य कर्माचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे. तसेच आपल्या इष्ट देवतेप्रती सेवाभावनेने आपली कर्तव्य कर्मे करण्यासाठी आपल्या अहंकाराचा उपयोग (पुरुषार्थ) कसा करावा याचे संस्कार दिलेले आहेत.



श्रीमद्भगवद्गीतेतील शेवटचा श्लोक  राजयोगाची पूर्तता स्पष्ट करतो.

अध्याय १८: श्लोक ७८:

यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। ७८ ।।

**भावार्थ :** ज्या ठिकाणी भक्तियुक्त कर्मयोगी व त्याची इष्ट देवता यांचा अर्जुन व श्रीकृष्ण यांच्याप्रमाणे एकोपा असतो त्या ठिकाणी यश, समृद्धी, शक्ती व नीती आपोआप वास करते.

-------oOo-------

## लेखकाचा परिचय



श्रीकांत रामचंद्र देशमुख हे भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांचे शिष्य आहेत. गॅलेक्सी लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भांडवलीय उपक्रमातून (व्हेंचर कॅपिटल) स्थापन झालेल्या कंपनीचे ते संस्थापक व प्रवर्तक आहेत. गॅलेक्सी ही फार्मास्युटिकल इंटरमीडिएट्स, कृषी आधारित उपयुक्त रासायनिक उत्पादने, परफ्यूमरी इंटरमीडिएट्सची निर्मिती करणारी कंपनी आहे. कंपनीचे छत्रपती संभाजीनगर आणि नेवासा, महाराष्ट्र-(भारत) येथे २ युनिट्स आहेत. कंपनीची संकल्पना १९९४ मध्ये भांडवलीय उपक्रम निधीद्वारे (व्हेंचर कॅपिटल फंडिंग) झाली आहे. श्रीकांत देशमुख यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनातून कंपनीने विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण रासायनिक तंत्रज्ञान आणि अद्वितीय अभियांत्रिकी कौशल्यांमुळे कंपनी प्रगती करत आहे.

एका लघु उद्योगाला वेगाने वाढणाऱ्या या यशस्वी उद्योगसंस्थेमध्ये विकसित करण्याचे यश हे अर्जुनाला आदर्श मानून श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या व्यावहारिक ज्ञानाचे व त्यामुळे केलेल्या विवेकपूर्ण प्रयत्नांचे प्रकटीकरण आहे.

मुख्यतः मागील ३७ वर्षांपासून, श्री. देशमुख आपल्या दैनंदिन कार्यात श्रीमद्भगवद्गीतेचे चरणबद्ध आकलन करत असून ते ज्ञान आत्मसात करत दैनंदिन व्यावहारिक जीवनात उपयोग करण्याचा प्रयत्न करत आहेत व येणाऱ्या अनुभूतींचा पाठपुरावा करत आहेत.

राजयोगाच्या अभ्यासावरील ही आध्यात्मिक अनुभूती त्यांनी केलेले श्रीमद्भगवद्गीतेचे मूल्यमापन आणि अनुभवलेले ज्ञान यावर आधारित आहे.

श्री. देशमुख हे आयसीटी (UDCT), मुंबई येथून केमिकल टेक्नॉलॉजी (फार्मा) मध्ये बी. टेक. झालेले आहेत. त्यांनी बहुराष्ट्रीय फार्मा कंपन्यांमध्ये उच्च पदावर काम केलेले आहे आणि उच्च तंत्रज्ञानाच्या वैज्ञानिक नवकल्पनांमध्ये ते निपुण आहेत. त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारित पेटंट्स कंपनीचा मुख्य आधार आहे.

लेखक हे स्वतः राजयोग म्हणजे भक्तियुक्त कर्मयोगाचे साधक आहेत व कंपनीतील सर्वांना राजयोग साधनेचे मार्गदर्शन करून त्यांच्याद्वारे रोजच्या जीवनात राजयोग साधना करून घेत आहेत. अशा प्रकारे श्रीमद्भगवद्गीतेतील मूळ शिकवणींचा सामूहिक जीवनात प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**टीम गॅलेक्सी**

GLPL®
Galaxy Laboratories Private Limited

-------o○o-------

# BYK YOG

## BYK योग आध्यात्मिक फोरम

बीवायके योग (BYK Yog) आध्यात्मिक फोरम ही एक लोककल्याणकारी (स्वयंसेवी/अशासकीय) संस्था आहे. या संस्थेचे मुख्य ध्येय श्रीमद्भगवद्गीतेतील मूळ शिकवण समाजात सर्व स्तरांवर जागृत करण्याचे आहे.

या सॉफ्टवेअर व डिजिटल काळातील वैज्ञानिक युगात निर्माण झालेल्या गतिशील व आव्हानात्मक अशा व्यक्तिगत, कौटुंबिक व वैश्विक जीवनशैलीत समाजातील विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींना श्रीमद्भगवद्गीतेतील मूळ शिकवणींची लौकिक जीवनात उपयुक्तता व प्रासंगिकता स्पष्ट करणे हा या संस्थेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

भक्तियुक्त कर्मयोग म्हणजेच राजयोग साधना. ही योग पद्धती सनातन आहे. परंतु काळाच्या ओघात लुप्त झाल्यामुळे ती पुनर्जागृत करण्याचा हा उपक्रम आहे. भक्तियुक्त कर्मयोग साधना वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक तसेच राजनैतिक आयुष्यात सुद्धा सुख, यश, स्थैर्य व समृद्धी प्राप्त करून देण्याची खात्री देते व व्यक्तीस राजयोगी बनवते.

राजनैतिक क्षेत्रात कार्यरत असलेले श्रेष्ठवर, विद्वान मंडळी तसेच उद्योजक, शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार वर्ग, कामगार बंधू, सर्व जाती-धर्मातील व सर्व वयोगटातील स्त्री-पुरुष, पत्रकार, मीडिया हाऊसेस व

आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्ती अशा सर्वांसाठी ती सारखीच प्रभावशाली व यश देणारी सोपी व सरळ अशी योगपद्धती आहे.

देशाच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त करण्यासाठी पण हा उपक्रम महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्तीचे आपल्या देशाप्रती व ईश्वराप्रती असलेले ते उत्तरदायित्व आहे.

सनातन धर्माची ही शिकवण पुनर्जागृत होणे म्हणजे राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीस आत्मनिर्भर होण्याची ही विद्या शिकविणे व समाजात ती संस्कारीत करणे. देशातील प्रत्येक व्यक्ती सुखी, समृद्ध, समाधानी होण्याच्या दृष्टीने सनातन धर्माची पुनर्जागृती हा एक महत्त्वाचा किंबहुना एकमेव पर्याय आहे. त्या प्रक्रियेतील हा एक छोटासा प्रयत्न आहे. हीच रामराज्य स्थापित होण्याची संकल्पना आहे.

या संस्थेचे कामकाज आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले स्त्री-पुरुष, BYK योगचे साधक व उद्योजक चालवितात. ही सेवाभावी स्वयंसेवी संस्था (NGO) देणगीदारांच्या देणगीवर, सभासदांच्या आर्थिक मदतीवर, देशातील सेवाभावी संस्थाच्या व सेवाभावी व्यक्तींच्या सहकार्याने चालवली जाते.

-------oOo-------

# राजयोग साधनेतील सात आधार चक्रे व त्यांची कार्यपद्धती




(संदर्भ : तक्ता क्रमांक २ ते १३; पृष्ठ ५९ ते ७१ अभ्यासावे)

## प्रभू श्रीराम

प्रभू श्रीरामाच्या सांसारिक जीवनातील महत्त्वाच्या घटना
भक्तियुक्त कर्मयोग साधनेचे सूत्र शिकवतात.

(ईश्वराने प्रभू श्रीराम यांच्या रूपात मानवी अवतार घेऊन
भक्तियुक्त कर्मयोग साधनेची शिकवण प्रस्थापित केली आहे)



सांसारिक जीवनात स्वधर्म, आपले कर्तव्य कर्म आणि आपल्या इष्ट (आराध्य) देवतेची सेवा या तीन गोष्टी आपल्या पुरुषार्थाने एकरूप केल्याने सुख, शांती आणि समृद्धी प्राप्त होते. वरील तिन्ही गोष्टींचे मार्गदर्शन करणारे ईश्वराचे मानवी रूप : भगवान श्रीराम, माता सीतादेवी, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न आणि श्री हनुमान इ.

// श्रीमद्भगवद्गीता //